१८०८

म. ग्रं. सं. ठाणे

विषय चरित्र

सं. क्र. २७७

दा. क्र. ४०१

REFBK-0000501

म. ग्रं. सं. ठाणे
क्र. [illegible]
नं. २२७.

# संत कोल्हबाजी महाराज.

यांचें

## सुरस चरित्र

लेखक व प्रकाशक
रामचंद्र भरोशा चिंचोळे
बुकसेलर
केळीबाग रोड [illegible]

हें पु[illegible]तक
क[illegible]त.

REFBK-0000501

कीमत ६ आणे.

नागपूर येथें:-गोविंद गडो यांच्या
यादवेंद्र प्रसाद छापखान्यांत छापिलें.

शाके १८३१ सन १९०९.

मोठी पतिव्र
...रांत

# श्री साधु कोलबाजी बोवा

## ह्यांचे

# सुरस चरित्र.

## उपोद्घात.

परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां ॥
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥१॥

श्रीमद्भगवद्गीता.

जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानी होईल, दुर्जनांचें प्रस्त माजेल, परधर्माचा शिरकाव होऊं लागेल तेव्हां साधूंचें संरक्षण करण्यास व दुर्जनांचा पाडाव करून धर्मसंस्थापना करण्यास मी युगायुगाचे ठायीं अवतीर्ण होतो असें परमेश्वरानें आपणास अश्वासन दिलें आहे. ह्याचा प्रत्यय आपणांस बरेंच वेळां आला आहे. कच्छ, मच्छ वराहादि अवतार घेऊन परमेश्वरानें दुष्टांचा संहार केला व सुजनांचें रक्षण केलें. शंकासुरानें ब्रम्हदे वेद हरण केले तेव्हां मत्स्यावतारांत श्री परमेश्वरानें दुष्टांचे निर्दालन करून वेद परत ब्रम्हदेवास दे शरिद्य ांना अजिक्य व ब्रम्हवरानें दर्पित झालेल्या ज बसले र परमेश्वरानें प्रल्हादाचें निमित्त पुढें करू तारांत नखांनीं स्वतः चिरला: बळीचा ग

रण्याकरितां बटुवेष धारण करून परमेश्वरानें वामनाव-तारांत बळिला पाताळांत दडपलें व शुक्राचार्याला एक-चक्षु बनविला; वडिलांच्या आज्ञेचें प्रतिपालन करण्यास श्री परशुरामानें तीन वेळ पृथ्वी निःक्षत्रिय करून सोडि-ली; गर्वमदानें व्यापलेले रावण, कुंभकर्ण, इंद्रजितादि हजारों दुष्टांचा संहार श्री रामावतारीं करून बिभिषणा-सारख्या सज्जनांना यावत् चंद्रदिवाकरौ अमर करून ठेविलें. कंस, पूतना, अघासुरादि असुरांचा संहार करून कृष्णावतारांत परमेश्वरांची गोपीगोपांवर फार प्रीति जड-ली, म्हणून त्यांचा उद्धार केला; दुर्योधन, शकुनि, जरा-संधादि बंधुद्रोही नराधमांचा नायनाट पांडवांच्या हस्तें करवून श्री परमेश्वरानें युधिष्ठिराचें धर्मराज्य सुरू केलें. व आतां निश्चलरूप धारण करून ते श्री जगन्नाथास बौद्धरूपानें तिष्ठत आहेत. परमेश्वरास ह्या सर्व सृष्टाची अतोनात काळजी आहे. कृमिकिटकापासून तों गजव्या-घ्रापर्यंत तों सर्वांचें सारखें पोषण करीत आहे.

कलियुगांत सुद्धां त्यानें आपलें वचन पाळलेंच आहे " कलियुगाचें बळें, झालें धर्माचें वाटोळें " अशी जरी ...ली स्थिती झाली आहे, आपण जरी आपल्या कर्त-...सून पराङ्मुख झालों आहोंत तरी परमेश्वर अजून ... कर्तव्य करितोच आहे. तो कलियुगांतसुद्धां आ-...मार्गांत आणण्यास एकसारखा प्रयत्न करी ... बौध्यधर्माचा प्रसार व हिंदुधर्माचा ऱ्हास ... श्रीशंकरानें स्वधर्म प्रसारार्थ शंकराचार्य...

मोठी पतिव्रता होती. स्वामींनीं आज्ञा तर केली परंतु घरांत धान्य मुळींच नाहीं उसणें मागावें तर तेंही कोणी देणार नाहीं असा विचार करून खिन्न बदनानें ती बसली असतां कोलबाचें तिकडे लक्ष गेलें तिच्या औदासिन्याचें कारण त्यांनीं तेव्हांच ताडलें. व खिन्न कां ? मडक्यांत धान्य आहे तें काढ अशी महाराजानीं सूचना केल्याबरोबर ती बाई लगेंच उठून उतरंडींतील मडक्यांत पाहूं लागली तों सर्व मडकीं अगदीं गच्च भरलेलीं ! त्यांनीं तें धान्य घेऊन सर्व स्वयंपाक केला व आलेल्या पाहुण्यास यथेच्छ जेवूं घातलें. सर्वांचीं जेवणें झाल्यावर अन्न पुन्हां बरेंच शिलक राहिलें तेव्हां त्यानीं तें गांवकरी लोकांस वांटून दिलें. चार दिवस पाहुण्यांना राहवून घेऊन नंतर कोलबाजीनें त्यांची यथायोग्य बोळवण केली. गांवकरी लोकांना मोठेंच आश्चर्य वाटूं लागले. कोणी ह्मणत हा साधु आहे. कोणी ह्मणत ह्याला बेताळ प्रसन्न झाला आहे, कोणी ह्मणत ह्याला पुरलेलें द्रव्य सांपडलें असावें. असे नाना तर्कवितर्क निघूं लागले व ह्या वेळेपासूनच कोलबाची प्रसिद्धी झाली.

---

## कोलबाचे सद्गुरु.

पाहुणे गेल्यावर कोलबाचें ईश्वरभजन व दारिद्र्य सारखें चालूं होतेंच. एकेदिवशीं सहज बसले

असतां आपण गुरु करावा असा त्यांचें मनांत विचार आला. गुरुवांचून जिणें व्यर्थ होय. गुरुशिवाय मनुष्यास मुक्ति मिळूं शकत नाहीं, असे उद्गार त्यांचे मुखांतून निघाले, तुळसाईनें ह्या गोष्टीस आपलें पूर्ण, अनुमोदन दिलें. आतां गुरु करावा कोणाला ? कारण, पानी पीना छानके । और गुरु करना पैछानके ॥ असे विचार त्याचें मनांत आले, व त्याप्रमाणें तें सद्गुरुच्या शोधास लागले. शोधतां शोधतां त्यांना एक अगदीं योग्य पात्र सांपडलें. धापेवाडयांत त्या वेळेस धर्मसेटी नांवाचा एक गृहस्थ राहत असे. ह्याचा धंदा रंगारी-पणाचा होता. हा संसारांत राहून अगदीं अलिप्त असे. ईश्वरभजनांत धर्मसेटी नेहमीं निमग्न असत. कोलबाचे मनांत यांना गुरू करावयाचें आलें. एके दिवशीं सायं-काळीं हे सेटीबोवाचे येथें गेले. त्या वेळेस बोवा समा-धिस्थ होते, म्हणून कोलबानें दुरूनच त्यांना दंडवत केलें. समाधी विसर्जन झाल्यावर त्यांनीं कोलबास येण्याचें कारण विचारले. तेव्हां कोलबा म्हणाले—

" साधुवर्य ! आपण ज्ञाते असून त्रिकालज्ञही पण आहांत. मी कशाकरितां आपले पायाजवळ आलों हें आपणास माहीत नसेल असें कांहीं नाहीं. तरी माझें तोंडूनच ऐकावयाचें असल्यास मी आपणास सांगतों— सद्गुरू हा मोक्षाचा मार्गदर्शक आहे. सद्गुरू-वांचून जिवंत राहणें अगदीं निरर्थक आहे म्हणून आपल्या पायाची अखंडित सेवा करावी हीच भार्य

पानें अवतीर्ण होऊन बौध्य मताच्या प्रचंड लाटांतून सनातनधर्माचें तारूं निर्विघ्नपणें पार पाडलें. तसेंच श्री रामदास, श्री ज्ञानोबा, मुक्ताबाई, जनाबाई, सोपानदेव, नामदेव, तुकाराम, गोणाई, कबीर, कमाल, इत्यादि अंशरूपानें अवतार घेऊन पुष्कळशा प्राकृत जनांचा त्यानें उद्धार केला. धन्य त्या परमेशाची लीला! फार दूर कशाला आपल्या हिकडेच अलिकडे मुकुंदराज, हरिहर स्वामी, महाराज अयाचित बोवा, गिरडचे ब्रह्मचारी बोवा, श्री पतिरामबोवा, केशवस्वामी, फकिरजी, आबाजी, तुकाराम बोवा, इत्यादि साधुरूपानें परमेश्वरानें अंशतः अवतीर्ण होऊन लोकांचा उद्धार केला व करीत आहे. आमचे चरित्र नायक श्री महासाधु कोलबाजी बुवा हे ह्या आमचे इकडच्या संत मालेंतील मुकुटमणि होत.

---

## जन्म व बालक्रिडा.

वर्धा जिल्ह्यांत सिंदीपासून सुमारें दहा कोसांवर, 'वेळ' नांवाचें एक लहानसें खेडें आहे. गांव मध्यमाचें वस्तीचाच पण टुमदार आहे. येथें घोड्याची यात्रा व भरत असते. लांकडाच्या घोड्यावर देवाला बसवून गांवकरी मिरवितात हीच काय ती तेथें पाहण्याची मौज असते ह्या गांवाला पहिलें वेळगांव म्हणत असत. येथेंच कोळी.

कोष्टी कुलांत जन्म झाला. त्याचे पित्याचें नांव देवाजी व मातेचें नांव देवका. देवका व देवाजी हे दोघे कृष्णावतारांतील वसुदेव देवकी होत असा ह्यांच्या चरित्रांत लेख आहे. विणकरी सपाट्यानें चाले व देवाजी पैसेही बरेच मिळवी. सायंकाळीं ईश्वरभजन करण्याचा ह्याचा सांप्रदाय असे. जेथें संतती असते तेथें संपत्ति राहत नाहीं व जेथें संपत्ति तेथें संततीची मारामार !! देवाजीस संतान काहींच नव्हतें. दोघांनींही संततीकरितां अहोरात्र परमेश्वराजवळ प्रार्थना करावी. " गृहरत्नानि बालकाः " पुत्रपौत्राशिवाय देवकास कसें बरें वाटणार ! परमेश्वरास ह्या दोघांची प्रार्थना ऐकून दया आली व त्यानें एके दिवशीं रात्रीं ह्यांना स्वप्न दिलें कीं " मी तुमची भक्ती पाहून प्रसन्न झालों आहे तुम्ही आपले मनांतील इच्छित वर मागा: त्या दोघांनीं पुत्र प्राप्तीची इच्छा दर्शविली व सदासर्वदा ईश्वरभजन करून आमच्या जातीचा उद्धार करील असा सुपुत्र देण्यास परमेश्वरास विनविले. " भगवंतानें ते कबूल केलें व म्हणाले " तुमची पुत्रप्राप्तीची इच्छा फार दिवसांपासून आहे. मी आज तुह्मांला प्रसन्न झालों आहे. कोष्ट्यांची जात फार अधर्मी आहे. विपुल द्रव्य मिळत सल्यामळें मद्यपानादि नीचकर्में करावयास ती कधींच वांचून पुढें पाहत नाहीं. त्यांचा उद्धार करण्यास व आपल्या सन्मार्गास लावण्यास मीच अंशरूपानें तुमचे अवतार घेईन व ह्या अति पापी लोकांस ईश्वरभ-

जनाकडे वळवीन " हा साक्षात्कार पाहून त्या दोघांनाही अतोनात आनंद झाला पुढें देवका गरोदर झाली. चंद्राच्या वाढत्या कलेप्रमाणें तिच्या उदरांतील गर्भ वृद्धिंगत होऊं लागला. व नऊ मास पूर्ण होतांच जेष्ट शुक्ल सप्तमी पुनर्वसू नक्षत्र, द्वितीयचरण, माध्यानाची वेळ अशा सुमुहूर्तावर श्री कोलबाचा जन्म झाला. जन्म कोणत्या शकांत झाला किंवा कोण्या इसवी सनांत झाला ह्याचा बरोबर पत्ता लागत नाहीं तरी दंतकथावरून समजतें कीं त्यांना जन्मून तीनकशे वर्षें झालीं असावींत.

कोलबा दिवसानुदिवस वाढूं लागला. गौरवर्ण, देदीप्यमान अंगकांती वगैरे त्यांच्या सुंदर स्वरुपाचीं लक्षणें पाहून कोणाची त्याला दृष्ट लागेल ह्मणून देवकानें नेहमीं निंबलोन करीत असावें. कोलबा पांच वर्षांचा झाल्यावर मुलांबरोबर तो खेळूं लागला. टिपरी, विटिदांडू, मृदंग, पाट्या, चेंडू, भोंवरा, इ० कृष्णलिलेंतील खेळ मुलें नेहमीं खेळत असत. कोलबाही खेळावयास जात असे. परंतु ह्यांना त्या खेळांत गोडी मुळींच वाटत नसे. हे सर्व खेळ ऐहिक आहेत, ह्यांपासून कांहींच अर्थ नाहीं असा नेहमीं ते उपदेश करीत.

ते ह्मणत गड्यानों! हा भोंवरा खेळून अर्थ काय! हा देहाचाच भोंवरा एकसारखा फिरत आहे, हा नेहमीं फेरे खात असतो. आपलें पाप किंवा पुण्य ह्या देहरू भोंवऱ्याची आरूं होय, आपली ईश्वरभक्ति किंवा अभाव हीच त्या भोंवऱ्याची दोरी होय, ह्या भों

गती देणें आपल्याकडेसच आहे. आपण जसा आपल्या पुण्य पापानें भोंवरा फिरवूं तसाच तो फिरेल. कोलबाजीचा उपदेश ऐकून मुलांनीं त्यांची थट्टा करावी व तृतीयप्रकृति ह्मणून त्यांना खेळांतून हांकून द्यावें परंतु हा मोठा साधू आहे असें त्यांना समजेना ! मृगाच्या मस्तकांतच कस्तुरी असते तरी सुगंध कोठून येतो हें त्यास मुळींच कळत नाहीं.

---

## गृहस्थाश्रम.

असे खेळ कोळबा बारा वर्षेपर्यंत खेळले. बारावें वर्ष लागतांच देवाजीनें ह्याच्या विवाहाचा विचार केला. देवाजीची वृद्धावस्था होत चालली हें पाहून कोलबाचे दोन हाताचे चार हात झालेले पाहिलें ह्मणजे मग मी मोकळा झालों असें कोलबाच्या बापास वाटूं लागलें. देवकेसही हा पतीचा विचार पसंत पडला व लेगच त्यांनीं स्थळ पहाण्याचें योजिलें. वेळ्यापासून सोळा कोसांवर सिंदी ह्मणून एक गांव आहे. तेथें यसोबा ांवाचा एक कोष्टी राहत असे. त्याच्या सुंदर व गोंडस येशी कोलबाचा विवाह झाला. लग्नसोहळा मोठ्या ...ाच झाला हें सांगावयास नकोच ! !

वांचू...चा, लग्न झाल्यावर ईश्वरचिंतनांत विशेपच नि-
आपर. कोलबानीं पुढें आणखी दोन स्त्रियाशीं लग्न केलें

एकूण त्यांना तीन स्त्रिया होत्या. त्यांचीं नांवें—पहिली तुळसा, दुसरी गंगा, व तिसरी गुणवंती अशा ह्या तिघीही स्त्रीया अतिसुंदर असून धार्मिक होत्या. पति-सेवेंत त्या नेहमीं तत्पर असत. व ह्यामुळेंच कोलबाचा संसार गरीबीचाच परंतु आनंदानें चालत असे. गृहस्था-श्रमांत जर आज्ञाधारक पुत्र. पतिव्रता पत्नी दयाळू स्वामी, इत्यादि गोष्टी अनुकूळ असल्या तरच त्यांत विशेष आनंद आहे. ह्या सर्वांहून श्रेष्ठ गृहस्वामिनी होय. भार्याच जर सुशीला नसली तर मनुष्याचें आयुष्याचें मातेरें होतें; परंतु मनाजोगी, सद्गुणी व सदाचारी स्त्री जर दैववशात् मिळाली तर तो प्रापांचि-क मनुष्य खरोखर धन्य होय. परंतु हा भवसागर तरून जाण्याला अशी सांगड मिळणें हें 'पूर्वदत्ताच या भार्या' ह्या प्रमाणें आपापलें पूर्व संचितावर अवलंबून असतें, कोलबाला गृहस्थाश्रम सुखानें भोगावयास मिळण्यासा-रखा होता परंतु कमळ किती वेळपर्यंत जरी पाण्यांत बुडवून ठेविलें तरी त्याला पाण्याचा स्पर्श होत नाहीं. तद्वतच साधुसंताची गोष्ट होय. हे संसारांत राहून अलिप्त राहतात कोलबाचे आईबाप निवर्तल्यावर त्या-च्या हृदयांत वैराग्य बाणलें व आपण आपल्या देहाचें कांहीं सार्थक तरी करावें असा त्यांनीं निश्चय केला व ते पंढरपुरास जावयाची तयारी करूं लागले त्यांनीं सामानसुमान बांधून ठेवून निघावयाची नक्की मिती ही ठरविली. परंतु ईश्वरेच्छा कांहीं निराळीच होती

वी निश्चय ईश्वरेच्छेपुढें पार लयाला जातो. त्याप्रमाणेंच कोलबाचें विचाराचें झालें. आवर्षण पडल्यामुळें गांवांत मोठा दुष्काळ पडला दुष्काळांत कशी स्थिती होते याची कल्पना वाचकांस नव्यानें करून देण्याची कांहींच जरूर नाहीं. दुष्काळ हा आमचे येथील आतां नेहमींचाच पाहुणा झाला आहे. त्यामुळें त्यांचा पराक्रम आम्हांला पूर्णपणें माहित आहे. वेळ्यास त्या वेळेस कोष्टयांची वस्ती फार होती. दुष्काळ पडल्याबरोबर कोष्टयांचा रोजगार सर्फ बुडला. बापड्यांना अन्नान्न दशा प्राप्त झाली. ह्या गावांत राहून उपयोग काय असा येथील कोष्टी पुढाऱ्यांनीं विचार करून तो गांव सोडण्याचा निश्चय केला. पाटील हवालदार कुळकर्णी इत्यादि कांहीं श्रीमंत कुटुंबे खेरीज करून सर्वांनीं पुढाऱ्यांच्या मसलतीस रुकार दिला व ते गांव सोडण्याचे तयारीस लागले.

---

## संकट निवारण.

गांवाबाहेर एक टेंकडी आहे. त्यावर एक मलंग रहात असे. [ मुसलमान फकिरास मलंग ह्मणतात ] हा मलंग मोठा साधु आहे अशी सर्वत्रांची खात्री होती. लोक गांव सोडून जाणार ही बातमी आमच्या [illegible]नायकास समजतांच ते मलंगाजवळ आले मलं-

गाच्या दर्शनास ते दररोज सायंकाळीं जात असत. वरील दिवशीं कोलबानें मलंगास सलाम करून गांवां-तील सर्व वृत्त निवेदन केलें व आतां लोकाचें रक्षण करणारे आपणच आहांत अशी मोठ्या आर्जवानें त्यांस प्रार्थना केली. परंतु मुसलमान ह्मणजे बोलणारे केवळ बृहस्पती असतात. मलंगास मोठा घुस्सा आला व तो ह्मणाला:—“ अरे, हमको तुह्मारा, तुह्मारे लोगोंका तुह्मारे गांव का क्या करना है. हम मस्त है. हम किसीकी भी पर्वा नहीं रखते. ” सांई, आपण मोठे ईश्वरभक्त आहां, आम्हांस वांचविणें सर्वस्वी आपणावरच अवलंबून आहे. आपण आपल्या ईश्वरा-जवळ या सर्व दुष्काळ पीडितांची दाद लावून जेणें-करून ह्या सर्व लोकांचे प्राण बचावतील अशी कांहीं योजना करावी एवढीच आपणाजवळ प्रार्थना आहे. ” असें कोलबा पुन्हां ह्मणाले. “ अरे, तो हमारा खुदा और तुह्मारा खुदा क्या न्यारा है ? ” असें मलंगानें मोठ्या आवेशानें उत्तर दिलें. सांई, आमचा ईश्वर तोच तुमचा ‘ खुदा ’ होय. परंतु आपण ईश्वरभक्त असल्यामुळें ईश्वराचे आवडते आहां म्हणून आपणास तकलीफ दिली आहे. हें कोलबाचे शब्द ऐकून सांई खूष झाले व म्हणाले. “ अच्छा बेटा, टेकडीके नीचे जो मारुती है उसकी प्रार्थना कर ऐसा करनेसे तेरे मनोरथ पूर्ण होंगे. ” एका ओट्यावर मारुतीची मूर्ति होती व ओट्याखालीं तुळशीचें बन होतें. मारुती

बोवाजवळ कोलबा गेले व त्यांनीं मारुतीचें स्तवनास प्रारंभ केला. एकांतमनानें मारुतीचें स्तवन केल्यावर मारुतीस करुणा आली व कोलबाजीचें कानांत परमेश्वरानें गुप्त गोष्ट सांगितली.

कोलबाच्या कानांत परमेश्वरानें गुज गोष्ट सांगितली त्याचा मतलब हा होता कीं, कोलबानें सर्व लोकांना मूठ मूठ धान्य वाटलें असतां दुष्काळ आहे तोपर्यंत धान्याची तूट म्हणून कशी ती पडणार नाहीं. ती परमेश्वराची आज्ञा कोलबास अमान्य करतां येईना पण तसें केल्यानें आपली कीर्ति वाढून कदाचित् त्या आढ्यतेंत राहिल्यानें जें कर्तव्य करावयाचें तें आपले हातून व्हावयाचें नाहीं असें त्याला वाटलें म्हणून त्यानें कीर्ति न होता ज्यानें मारुतीकडे आपणास पाठविलें त्या मलंगाला सर्व श्रेय मिळून दुष्काळ पीडितांस सहाय्य करतां येईल असा अन्य उपाय सांगण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना केली. तेव्हां कोलबाची निसीम भक्ति जाणून परमेश्वरानें ओट्याखालीं असलेलें ८०० रुपये काढवून नेण्यास सांगितलें. आणखी कोलबाला असेंही सांगितलें कीं, ' पंढरपुरास जाण्याचा तुझा जो बेत झाला आहे तो रहीत करून तूं **धर्मनगरास** जा कारण आम्हांसही तेथें यावयाचें आहे. इतकें परमेश्वरानें कोलबाच्या कानांत सांगितलें नाहीं ...च हा दृष्टांत संपला. कोलबा डोळे उघडून जों ...' कोंबड्यानें बाग दिला.

नंतर लवकरच सूर्याचें आगमन सूचक आकाश लाल झालें होतें. मलंगाच्या निमाजाचा अवाज एकसारखा चालला होता. " चलो, चलो सूर्य उजाडोस उठबोनरे, चलबो, चलबो " असा दुष्काळपीडित कोष्ट्यांचा कलकल आवाज एकसारखा गांवांतून येत होता. त्याच सुमारास कोलबा गांवांत जाऊं लागले तोंच सर्व कोष्टी गांव सोडून जातांना त्यांचे दृष्टीस पडले. तुम्ही मला टाकून कोठें जातां असा त्यांनीं लोकांस प्रश्न केला. ' आम्ही दुष्काळामुळें हा गांव सोडून जात आहोंत. ' असें लोकांनीं सांगतांच ते त्यांना त्या पुरलेल्या द्रव्याकडे घेऊन गेले व मलंगानें हें आपणास द्रव्य दिलें आहे. तें उकरून घ्या, असें ह्मणाले.

हें शब्द ऐकतांच सर्वांना अत्यानंद झाला. त्यांनीं लगेच तें धन उकरून काढलें व सर्वांनीं हिश्शाप्रमाणें वांटून घेतलें. मलंगानें द्रव्य दिलें आहे हें कोलबानीं अगोदरच सांगितलें होतें. त्यामुळें मलंग साधुची कीर्ति गात ते सर्व गांवांकडे वळले. पुढें कर्णोपकर्णी ही गोष्ट गांवाचें पाटलास समजली. लोकांना द्रव्य मिळालें हें पाहून त्यांना मोठाच घुस्सा आला, व ही जागा मुरब्बी असून हे गवळ्याचें धन असतां येथील द्रव्य लोकांनीं कां नेलें ह्याबद्दल चौकशी सुरूं केली. लोकांना विचारतांच त्यांनीं मलंगाचें नांव पटकन सांगितलें. कामदारांनीं मलंगास पाटलापुढें हजर के-

व त्याला ह्या संबंधीची माहिती विचारली. परंतु मला कांहीं माहित नाहीं हें सर्व कोलबाला माहित असावे असें मलंगानें सांगितल्यामुळें पाटलानें कोलबास विचारले कोलबानें परमेश्वरावर ढकलले त्यामुळें कोणत्या गोष्टीचा उलगडा न होतां चौकशीअंती कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अखेरीस पाटीलबोवांनीं आत्महिताची एक गोष्ट सुचविली व ती सर्वांना मान्य पडली. प्रत्येक जणा जवळून एक एक मोहर घेऊन पाटलानें त्या मुकद्दम्याचा निकाल लावला. व मलंगावरच संशय ठेवून त्याला गांवाच्या हद्दीबाहेर काढून दिले. तें द्रव्य लोकांना पुरेसें झालें.

---

# धर्म नगरीस प्रयाण.

ईश्वराच्या सांगण्यावरून कोलबानीं धर्मनगरीस जाण्याची तयारी केली. पंढरपुरचा त्यांनीं नाद सोडून दिला व ते सहकुटुंब सहपरिवार धर्मनगरीस गेले.

निर्धनता मोठी कठीण आहे. कारण, ह्मटलें आहे कीं, " ज्यासी निर्धनता गांजी । तो नर होतो जगिं पाजी " कोलबा पाहिलें खाऊन पिऊन चांगलें सुखी होते परंतु ते सदय अंतःकरणाचे असल्यामुळें त्यांचें होतें तें त्यांनीं दुष्काळांत वाटून दिलें व आपण निर्धन बनले. धर्मनगरीस यावयाचें वेळेस

त्यांचे जवळ कांहींच नव्हतें. धर्मनगरीपर्यंत ते सहकुटुंब पादचारी होतें. लक्ष्मीशीं व ईश्वरभक्त वैष्णवाशी मोठें वैर. तुकाराम, कबीर कमाल इत्यादिकांप्रमाणेंच कोलबा अत्यंत दरिद्री पण खरे ईश्वरभक्त होतें. वेळ्यावरून निघून ते धर्मनगरीस येऊन पोहचले. धर्मनगरी म्हणजे धापेवाडे ज्याप्रमाणें काटोलला जैमिनीअश्वमेध नामक ग्रंथांत कौंतलापुर म्हटलें आहे, सावनेरला सारस्वतपुर, नागपुरला फणिपूर अशी नावें होतीं त्याप्रमाणेंच धापेवाड्यास धर्मनगरी म्हणत असत. खरोखरच नांवाप्रमाणें त्यावेळीं ती नगरीही तशीच होती. धर्मनगरीस नारदाचा वर होता. येथें मोठमोठ्या साधूंचें वास्तव्य होऊन गेले. त्यांच्या अजून समाधी आहेत. धापेवाडा कळमेश्वरवरून अडीच कोस आहे. तेथें चंद्रभागा नदी हुबेहुब पंढरपुराप्रमाणेंच देवाचें पायरी जवळून वाहतें. श्रीविठ्ठल रुखमाबाईचें मंदीर झाल्यावर चंद्रभागा नदी तेथें आली असा लोकांचा समज आहे व तो खराही असेल. कारण, ह्या छोट्या चंद्रभागेचा उगम मेटपांजरा ( काटोल तहसील ) येथें झाला आहे व तेथून निघून ती लगेच पाटणसावंगी जवळ कोलार नदीस जाऊन मिळते. येथें आषाढीचे दुसरे दिवशीं मोठा भारीच उत्सव होतो. त्याच वेळेस पंढरीनाथ तेथें येतात असें लोक ह्मणतात. धापेवाड्याविषयींची जास्त माहिती आमचे ‘ धापेवाडा महात्म ’ ह्या नांवाच्या पुस्तकांत दिली आहे.

कोलबा धापेवाड्यास येऊन राहूं लागले. धापेवाड्यासही कोष्ट्यांची वस्ती फार होती. कोलबाला सर्व लोक ' कोल्ह्या ' म्हणत असत. ह्यांची रहावयाची एक लहानशी गवताची झोपडी असे तथेंच राहून हे आपली गुजरान करीत. ह्यांनीं दिवसभर एखादे धोतर ( पांचहाती ) किंवा ज्याला कोष्टी लोक ' सनंग , म्हणतात तें विणून सायंकाळीं बाजारांत विकावें. त्या बद्दल त्यांना सुमारें तीन आणे मिळत. त्यांत त्यांनीं आपल्या कुटुंबाचा निर्वाह करावा. ऐके दिवशीं मोठा चमत्कारिक प्रकार घडून आला. कोलबानींच आपणास पोशिलें व त्यांनींच आपणास द्रव्य दिलें असा वेळ्यांतील पुष्कळ लोकांचा समज झाला होता. व त्यामुळें ते त्यास साधु समजूं लागले. अशा साधुचें दर्शन घ्यावें ह्या इच्छेनें वेळ्याहून कांहीं मंडळी कोलबाचे दर्शनास धापेवाडा येथें आली. धापेवाड्यास आल्यावर कोलबाजीबोवा कोठें राहतात असें पुष्कळांना विचारलें परंतु त्यांचें घर कोणींच दाखवीना ! अखेरीस एका कोष्ट्यानें कोलबाजी म्हणजे आपला कोल्ह्या असेल असा अर्थ घेऊन त्यांना त्याची झोंपडी दाखवून दिली. ते लोक झोंपडीजवळ आले व कोलबास काम करतांना पाहून त्यांनीं साष्टांग दंडवत केलें. कोलबानींही ह्यांना भेट दिली व आपण लवकर स्नानादि क्रिया करून भोजन करावें अशी हात जोडून प्रार्थना केली. इकडे नळसाईस पाकनिष्पत्ति करण्यास आज्ञा केली. तुळसाई

दासाची ईच्छा आहे. ”

धर्मसेटी म्हणाले—कोलबा, भलत्यालाच गुरू करूं नये. गुरू होण्याची योग्यता ज्या पुरुषांचे आंगांत आहे असे वर्णश्रेष्ठ ब्राम्हण ह्यांना तूं गुरू कर. आह्मी जातीचे हीन, कर्मभ्रष्ट, व संसारांत अगदीं मग्न झालेलों. आम्हांपासून तुझा उद्धार होणें अगदींच दुरापास्त आहे. असें बोलून सेटीबोवानें कोलबास लावून दिलें तरी पण कोलबाचा दृढनिश्चय मुळींच ढळला नाहीं. ते दररोज रात्रीं सेटीबोवाचें दर्शनास येत व आपली नेहमींची विनंती करीत. एके दिवशीं कोलबा नित्य नियमाप्रमाणें आलें असतां मकरंदपुरी धर्मसेटी बोवाजवळ बसले होते. मकरंदपुरी व धर्मसेटी हे दोघेहीं गुरुबंधु होत. ह्यांचे बंधुप्रेम मोठें विलक्षण होतें. मकरंदपुरीही सेटीबोवाप्रमाणें धर्मनिष्ट व ईश्वर भक्तिपरायण होते. ह्या थोर पुरुषाची देह समाधी अजून धापेवाड्यास आहे. भाविक लोक मकरंदपुरीच्या समाधीचें दर्शन घेतल्याशिवाय बाहेर जात नाहींत.

अस्तु. कोलबा आल्यावर त्यांनीं नेहमींप्रमाणें धर्मसेटीची कळकळीनें प्रार्थना केली तेव्हां मकरंदपुरीचें अंतःकरण द्रवलें. त्यांनीं मध्यस्थी पडून धर्मसेटीस विनंती केली. मकरंदपुरीचें म्हणणें महाराज कसे मोडतील ! तशांत कोलबा सत्‌शिष्य आहेत अशी त्यांची खातरी झाली होती.

तेव्हां त्यांनीं मोठ्या प्रेमानें कोलबाचा अंगिकार

केला. गुरूपुजेचा तो अपूर्व थाट काय वर्णन करावा ! सेटीबोवा व कोलबा ह्यांची हरिहराच्या भेटीसारखी भेट झाली मग तो महिमा किती वर्णनीय ? कांहीं दिवस लोटल्यावर सेटीबोवानें मकरंदपुरीस व कोलबास बोलावूं पाठविलें. ते आल्यावर आतां आमची मृत्यु-लोकची वस्ती संपली. आम्ही माघ शुद्ध चतुर्थीस येथून निघून पंचमीस वैकुंठास जाणार असें त्यांनीं सर्वांस मोठ्या प्रेमानें कथन केलें. सद्गुरूचा वियोग होणार म्हणून कोलबास अत्यंत वाईट वाटलें. तसेंच बंधुविरहाच्या दुःखाची कल्पना पुर्वीचे डोळ्यासमोर येऊन त्यांना अतोनात दुःख झालें. परंतु करतात काय ? सेटीबोवाचे इच्छेआड कोणीच येऊं शकत नव्हतें ! त्यांच्या इच्छेप्रमाणें माघ शुद्ध ४ स सेटी-बोवाचे प्रयाणाची तयारी झाली ! गांवांतील सर्व लोक अश्रुपूर्ण नयनांनीं सेटीबोवाजवळ जमले ! भजन, व दिंड्याचा सुकाळच झाला. अशा थाटामाटानें माघ शुद्ध चतुर्थीस दिवसा तिसरे प्रहरीं सेटीबोवा धापेवाड्या-वरून निघाले. सर्व मंडळीसह सायंकाळचे वेळेपर्यंत ते एकसारखे चालतच होते. सायंकाळीं ते श्रीअधोक्षेत्रास येऊन पोहचले. अधोक्षेत्रास त्यांनीं मुक्काम केला व श्रीगजाननाचें दर्शन घेतलें. " कलौ चंडी विनायकः " असें संस्कृतांत म्हटलें आहे व ह्मणूनच सेटीबोवा आपले शिष्यवर्गासह येथें आले.

श्रीअधोक्षेत्र ह्मणजे श्रीक्षेत्र अदासें हें होय. अधो-

क्षेत्र हें आदाशाचें जुनें नांव. आदासें कळमेश्वराहून साडेतीन कोस आहे. येथें एका उंच टेंकडीवर श्री गजाननाचें हेमाडपंथी देऊळ आहे. व त्यांत मोरयाची स्वयंभू प्रचंड मूर्ति आहे. पहाडावरील देखावा मोठा अल्हादकारक आहे. येथें गुलतुऱ्याची झाडें असंख्य आहेत. इतकेंच नव्हे परंतु ह्या पहाडावर नानातऱ्हेच्या उपयुक्त वनस्पति आहेत. श्रीगजाननाचें देवळाजवळच एक दुसरें देऊळ आहे. त्या देवळांतील आवारांत असंख्य मूर्ति आहेत परंतु त्या सर्व भंगल्या आहेत. कोणास हात नाहींत तर कोणाचीं शिरें तुटलेलीं आहेत अशी सर्वत्र स्थीति आढळते. त्याच आवारांत एक मारुतीचें लहान पण उंच देऊळ आहे व त्याचें अगदीं जवळ एका लहानशा देवळांत शिवपंचायतन आहे. प्रत्येक चतुर्थीस येथें थोडी यात्रा भरतेच, परंतु अंगारिकाचतुर्थीस मोठीच यात्रा भरते त्यावेळीं दुरदुरची संत मंडळी येतात !

अस्तु. रात्रौ शेटीबोवा येथेंच राहिले. दुसरे दिवशीं प्रातर्विधी आटोपून त्यांनीं कोलबास मकरंदपुरीचें सांभाळीं घातलें व सर्वांचा निरोप घेऊन ते माघ शुद्ध पंचमीस उत्तरेकडे निघून गेले ते गेलेच. त्यांचा अजून पत्ता नाहीं.

# परमेश्वराची भेट.

सेटीबोवा गेल्यावर सर्व मंडळी घापेवाड्यास परत आली. कोलबाजीला फारच वाईट वाटे पण करणार काय ? मकरंदपुरीच्या सांगण्यावरून ते त्रिकाळ भजन करीत असत. त्यांना गाणे बजावणें कांहीं येत नव्हतें तरी ते भजन अगदीं भक्ति पुरस्सर करीत. " वेडे वांकडे गाईन ॥ परि तुझाचि म्हणवीन " ह्या तुकारामाच्या म्हणण्याकडे त्याचें नेहमीं लक्ष असे. मोठा गाणारा असला, तालसुराचा जाणता असला किंवा वाद्यकलेंत प्रवीण असला तरी भक्ति असल्याशिवाय निव्वळ मृदंगाच्या आवाजानें परमेश्वर वश होत नाहीं. तालसूर एकीकडे । माझें गाणें भलतीकडे ॥ अशांतला जरी प्रकार असला तरी तेंच निस्सीम भक्ताचें गायन गान–प्रिय परमेश्वराला पसंत पडते. ईश्वरभजनांत तालसुराचें ज्ञान हा मुख्य भाग नव्हे भक्ति मुख्य आहे व बाकीची सर्व त्यांचीं उपांगे आहेत. कोलबाची भक्ति अशाच प्रकारची होती. व ते सदैव निस्सीम भक्तीनें भजन करीत.

त्यांना पुढें चार मुलें झालीं. मुकुंद, रामचंद्र, बापू, व काशीनाथ अशीं त्यांचीं नांवें होतीं. मुकुंद मोठा झाल्यावर संसार सर्वत्र तोच चालवूं लागला व त्यामुळें कोलबास ईश्वरभजन करण्यास पुष्कळ वेळ सांपडे.

ईश्वर भजनाचें वेळेस ते देहभान विसरून जात. एके दिवशीं ते अशा प्रकारें भजन करून देवाचा धांवा करीत असतां परमेश्वर संतुष्ट होऊन कोलबास भेट देण्याकरितां वैकुंठाहून रुखमिणी जवळून उठून धर्मनगरीस आले. कोलबाचे डोळे लागले होते. त्यांनीं कोलबास पोटाशीं कवटाळून धरितांच त्यांनीं डोळे उघडले व पांडुरंगास साष्टांग दंडवत केलें. वर माग म्हणतांच सदां माझे डोळा जडो तुझी मूर्ति । रखुमाईचा पति सोयरिया ॥ १ ॥ हाच वर कोलबानींही मागितला. ते ह्मणाले पांडुरंगा तूं मजजवळ नेहमीं राहिलें पाहिजे हीच माझी इच्छा आहे. कोलबाची इच्छा पूर्ण करण्याचें पांडुरंगानें अभिवचन दिलें व पुढें ते तेथून चालते झाले.

इतक्यांत वैकुंठांत श्रीविष्णुची पूजा करण्याकरित सहस्र कमलें घेऊन महादेव व ब्रम्हदेव येऊन पोंहचले तों तेथें देव नाहींत. ह्याचें त्यांना मोठेंच आश्चर्य वाटलें. ते परत जाणार तोंच पांडुरंग लगबगीनें परत आले हें पाहून आपण अशा वेळेस कुठें गेला होतां ? असा विरंचीनें प्रश्न केला.

" माझा परमभक्त कोलबा धर्मनगरीस आहे त्याची भेट घेण्याकरितां मी तेथें गेलो होतो " असें परमेश्वरानें उत्तर दिलें. " आह्मांलाही त्या परमपूज्य भक्तांचें दर्शन होईल काय ? " अशी त्या दोघांनीं इच्छा केल्यावरून श्रीविष्णू विमानातून धापेवाड्यास यावयास

निघाले. तिघांनींही बैराग्याचे वेष घेतले होते. त्यावेळेस कोलबा आपल्या शिष्यवृंदासह बाहेरील ओट्यावर बसले होते तोंच ह्या तीन्ही मूर्ति तेथें येऊन प्राप्त झाल्या. असे तेजस्वी बैरागी पाहून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें परंतु कोलबांनीं त्यांना तात्काळ ओळखिलें व धांवत जाऊन साष्टांग दंडवत घातलें. कोलबास आशिर्वाद देऊन ते तिघेंही दाराबाहेर आले. तोंच भांडारी [ किंवा कोठिवान ] शिदासाहित्य घेऊन त्याचें मागोमागच गेला. परंतु तितक्यांत ते तिघेंही गुप्त झाले. महाराज रागावतील अशी कोठीवानास भीति पडली व त्यानें लगेच झालेला वृत्तांत महाराजास कळविला. महाराज हांसलें व गड्यानों ते बैरागी नव्हत. ते साक्षात् त्रैमूर्ती आहेत अशी त्यांची समजूत करून दिली. हें ऐकतांच सर्व शिष्यमंडळीस मोठें आश्चर्य वाटले. कोलबाचे येथें सदावर्त चालू होतें तें हल्लींही अजून चालू आहे. दुष्काळासारख्या मोठमोठ्या अडचणींतून देखील तें निभावलें मग काय ?

त्या दिवसापासून कोलबाचें हयातीपर्यंत श्रीविष्णू त्यांना त्रिकाळ दर्शन देत असत. कोलबाजींची बसावयाची गादी ज्या खोलींत आहे त्याच खोलींत आतां श्रीविठ्ठल रखुमाईच्या मूर्ति आहेत.

# नरसिंहभट्ट बुजूरकार.

नरसिंहभट्ट बुजूरकार ह्या नांवाचा एक देवीउपासक ब्राह्मण नागपुरांत राहत असे. ह्याचा पेशा हरिदासाचा कुठेंही कीर्तन करून आपला निर्वाह करावा व देवीची निस्सीम भक्ति करावी. हे मोठे विद्वान व नामांकित कितनकारांत मोजले जात असत ह्मणून परगांवी बहुत करून ह्यांनाच बोलाविण्यांत येई.

काटोल तहसिलींत केळवद नांवाचें एक गांव आहे. तेथें कोणी गंगाधरपंत रहात असत. त्याचें घरीं देवीचा उत्सव [ नवरात्र ] मोठ्या थाटामाटानें होई. एके वर्षी उत्सवांत कीर्तन करण्याकरितां त्यांनीं बुजूरकारास बोलाविलें त्याप्रमाणें ते तेथें गेले. उत्सवांत त्यांची एक दोन कीर्तनें झालीं व नंतर नागपुरास यावयास ते धापेवाड्याचें रस्त्यानें निघाले. धापेवाड्याला त्यांनीं एक दिवस मुक्काम केला व दुसरे दिवशीं ते घोड्यावर बसून नागपुरास येऊं लागले. कांहीं अंतरावर आले असतील तोंच ह्यांना देवीनें दर्शन दिले व सांगितलें कीं, तूं धापेवाड्यास राहून देखील कोलबाजीचें दर्शन घेतलें नाहीं ही मोठी चूक केली. कोलबाजीसारख्या साधुच्या गांवीं जाऊन दर्शनाविषयीं इच्छा न ठेवणें हे मोठें पाप आहे. ह्याकरितां तूं मागें फिरून धापेवाड्यास जा व त्या संताचें दर्शन घेऊन ये. इतकें सांगून देवी गुप्त

झाली. भट्टजी मोठ्या विचारांत पडले. आपण स्वप्नांत आहोंत किंवा जागृत आहोंत शेवटीं देवाच्या आज्ञेप्रमाणें भट्टजी मागें वळले व धापेवाड्यास येऊन त्यांनीं कोलबाची भेट घेतली. व त्यांना साष्टांग प्रणिपात केला ' वर्णानाम् ब्राह्मणो गुरुः " हें तत्व लक्षांत आणून कोलबानींही त्यास दंडवत केलें. तेव्हां भट्टजीनीं मार्गांत झालेला सर्व वृत्तांत त्याप्रत निवेदन केला. नरसिंव्हभट्ट बुजूरकार एक दोन दिवस तेथेंच राहिले. एके दिवशीं रात्रौ त्यांचे कीर्तनही करविण्यांत आलें. कीर्तनकारांनीं ब्रह्मनिरूपणादाखल नाम महिमा वर्णन केला. कीर्तनास फार रंग आला होता. व सर्व श्रोते ईश्वर भजनीं अगदीं तल्लीन झाले होते.

दुसरें दिवशीं कोलबानीं त्याची बोळवण केली. बुजूरकार कोलबास साष्टांग नमस्कार करून नागपुरास रवाना झाले. तेव्हांपासून कीर्तनांत अगोदर हे कोलबा संताचा उच्चार करीत. त्यामुळें नागपुरकरांसही कोलबाविषयीं माहिती होऊं लागली.

नागपूर शहरांतील बुधवार पेठेंत गोदुशेट ह्या नांवाचा एक श्रीमंत कोष्टी रहात असे. आपल्या जातींत कोलबा ह्मणून एक मोठा साधू आहे असें त्यानें बुजूरकाराकडून ऐकिले व कोलबाचें दर्शन घ्यावें अशी त्याला इच्छा झाली. त्याप्रमाणें तो धापेवाड्यास गेला व कोलबाची मनोभावें सेवा चाकरी करून राहूं लागला त्याची निस्सीम भक्ति पाहून कोलबा प्रसन्न झाले

व त्यांनीं गोंदबावर अनुग्रह केला. त्याच सुमारास पुन्याजी बावन्या व कोंडबा हे देखील कोलबाचे शिष्य होऊन सेवा करूं लागले पुन्याजी व कोंडबा हे धापेवाड्याचेच राहणारे होत परंतु गोंदबाचे घर नागपुरास होते. गुरु सेवेंत लीन झाल्यामुळें गोंदबास घरची आठवणच येईना व महाराजांनें एक दोन वेळ विचारले तरी माझा वडील पुत्र आहे. मला घरची फिकीर नाहीं असें सांगून त्यानें वेळ मारून न्यावी. प्रपंच करून परमार्थ साधावा अशी कोलबाची इच्छा होती व म्हणून महिन्यांतून एकवेळ घरी जात जा असें कोलबानीं गोंदबास सांगितलें. त्याप्रमाणें तो पुढें करू लागला.

महाराजांची किर्ती दिवसेंदिवस जास्त वाढूं लागली. स्त्रियाही येऊं लागल्या म्हणून स्त्रियांना उपदेश करण्यास कोलबानीं आपल्या मुख्य स्त्रीस ( तुळसाई ) आज्ञा केली. कोलबाचे पुष्कळ चमत्कार होऊं लागले माघ शुद्ध पंचमीस ह्यांचें गुरु वैकुंठास गेले ह्मणून बसंतपंचमीचे दिवशीं ह्यांचें येथें गुरुची पुण्यतीथी होत असे. हा उत्सव अजून देखील त्यांचे येथें होतच असतो. चंद्रभागेचे वाळवटांत भव्य मंडप उभारत व तेथेंच भोजनें वगैरे होत. एकेवर्षी उत्सवांत रात्रौ एका ब्राम्हणानें मला ह्यावेळेस दही पाहिजे अशी अड धरिली. अपवेळेस दही कोठें मिळणार ? गांवात चौकशी केली परंतु कोठेंच पत्ता लागेना. ब्राह्मण तर अडूनच बसला. महाराजास मोठी चिंता पडली व ब्राह्म-

णाची इच्छा तृप्त करण्याकरितां त्यांनीं खोलींत जाऊन परमेश्वराचा धांवा सुरू केला. परमेश्वराला भक्तांची काळजी असतेच परमेश्वर तात्काळ धांवून आले व घाबरूं नको पाकशाळेंत दह्यानें तीन गुंड भरले आहेत असें सांगून गुप्त झाले. कोलबा उठून पाकशाळेच्या बाजूस उभे राहिले व येथें ह्या गुंडांत दही आहे तें घ्या असें आचाऱ्यांना सांगूं लागले आचाऱ्यांना तें खरें वाटेना कारण त्यांनीं नुकतेंच चंद्रभागेचे पाणी आणून गुंडांत भरून ठेविलें होते तरी महाराजांच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं गुंडावरील झांकणें काढलीं तों आंत दहीं ! त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. सर्वांनीं महाराजांचा जयजयकार करून ब्राम्हणाची इच्छा पूर्ण केली. या वेळेपासून ब्राम्हणांना भोजन देणें अगदीं बंद केलें आहे. कोणीही ब्राम्हण आल्यास त्याला शिधा देतात व स्वयंपाक करून खाण्यास प्रार्थना करितात.

---

## दुसरू दिवाण.

उत्सवाचें दुसरे दिवशीं लळीत झालें व सर्व शिष्य मंडळीची महाराजानें बोळवण केली. उत्सवांत झालेला चमत्कार गांवोगांवीं पसरला व पुष्कळ लोक महाराजापासून उपदेश घेण्यास येऊं लागले. धापेवाड्याचें

त्त्तरेस चार कोसांवर वाकोडी नांवाचें एक लहानसें खेडें आहे. घरसंख्या व लोकवस्ती फार थोडी आहे. ह्या खेडयांत त्यावेळेस दसरू नांवाचा एक कोष्टी रहात असे त्याला संततीसंपत्ति अनुकूळ होती. पूर्वीचा तो धापेवाडच्याचाच राहणारा होय व तेथें त्याचें घरही होते. एके दिवशीं कांहीं कामानिमित्त हा धापेवाडयास आला तेव्हां श्रीकोलबाचें दर्शन घ्यावें अशी त्यास इच्छा उत्पन्न झाली. तो महाराजाकडे गेला व त्यांना साष्टांग दंडवत करून तेथें चाललेली ज्ञानचर्चा ऐकत बसला तितक्यांत एक विलक्षण चमत्कार त्याचे पहाण्यांत आला. गोंदबा व पुनाजी हेही तेथेच कोलबाचे सेवेंत हजर होते. महाराजानें तंबाखु मागितला ह्मणून गोंदबानें हातावर तंबाखु घेऊन हात पुढें केला. तितक्यांत महाराजांची समाधी लागली. सर्व लोक घाबरले परंतु गोंदबास माहिती असल्यामुळें तो घाबरला नाहीं त्यानें आपला हात तसाच ठेवला. एक दिवस पावेतों महाराज देहावर नव्हते. नंतर देहावर आल्यावर आमची मावशी कोठे आहे असा कोलबानीं प्रश्न केला. महाराज तिला मरून एक वर्ष झालें असें मंडळीनीं सांगतांच ते स्तब्ध झाले परंतु त्यांच्या विदेह वृत्तीबद्दल लोकांस फार कौतुक वाटलें.

हा चमत्कार पाहून दसरूस फार आनंद वाटला व अशा संतास शरण रिघावें असा दृढ निश्चय करून दर्शन घेतल्यावर हा गांवांस गेला. घरादाराची सर्व

व्यवस्था लावून व सर्व मंडळीची संमत्ति घेऊन फिरून दुसरे दिवशीं दसरू धापेवाडयास आला महाराजानें लवकर येण्याचें कारण विचारलें असतां संकोचानें ह्यानें तें सांगितलें नाहीं. दसरूचे त्याशीं बोलण्याचें धैर्यच होईना. अखेरीस गोंदबाच्या मध्यस्तीनें त्यानें आपला इष्ट हेतु महाराजांस कळविला. हा खरा मुमुक्षु असून अहंपणा धारण करून आला आहे असें कोलबानीं तेव्हांच ताडलें. व म्हणून कांहीं महिने पावेतों दसरू जवळून सेवा घेतली व नतर त्याला मंत्रोपदेश केला. दसरूचो समाधीयोग शिकण्याची मोठी इच्छा होती. म्हणून एक दिवस महाराजानें त्यास समाधी कशी लावावी हें सांगितलें. परंतु समाधी लागतांच तो एकदम घाबरून निचेष्टित पडला. महाराजानें त्यास सावध केले. व कां घाबरलास म्हणून विचारलें. दसरू ह्मणाला महाराज त्या भयंकर राक्षसांच्या फौजा पाहून मी घाबरलो. " अरे तो यम लोक आहे. घाबरूं नकोस असें कोलबानीं त्यास समजावून सांगून पुन्हां समाधी लावविली व त्यास सर्व यम लोक दाखवून दिला. दसरूवर कोलबाची फार प्रीती बसली. दसरू कोलबाचा पट्टशिष्य झाला व त्याला त्यानीं दिवाण नेमिलें.

दसरू मोठा वस्ताद होता. त्यांनीं महाराजाजवळून खालील तीन गोष्टी मागून घेतल्या.

[१] मी आहे तोपावेतों माझी दिवाणगिरी चालावी.

[२] माझें काम दुसऱ्यानें करूं नये.

(३) मला आपण कांहीं तरी प्रसाद द्यावा.

कोलबानीं त्याच्या तीनही अटी कबूल केल्या प्रसादादाखल. त्यांनीं आपलें बसावयाचें आसन दसरूस दिलें व तूं लोकांस सन्मार्गास लाव असा उपदेश केला. दसरू वाकोडीस आल्यावर त्यानें आपली गादी स्थापन केली व पुष्कळशे शिष्य करून दांभिकी मिरवू लागला. गुरुचें त्याला स्मरण देखील होईना. गर्वांधानें तो आंधळा झाला होता. ह्मणतात ना कीं, बुडत्याचे पाय डोहाकडे.

एके दिवशीं कांहीं कामाकरितां तो घोपवाड्यावरून कळमेश्वरचे बाजारीं आला परंतु त्यांनीं कोलबाचें दर्शन घेतलें नाहीं. कळमेश्वरांत एका कोष्टयाचें येथें उतरला. त्याच दिवशीं रात्रीं कळमेश्वरांतच त्याला सणसणून ताप आला व त्याचें हातास एक फोड झाला. फोडाच्या प्राणांत व्यथा होऊं लागल्या. दुसरें दिवशीं तो घोपवाड्यास जाऊन राहिला. कोलबानीं त्याची आठवण केली तेव्हा तो बिमार आहे असे लोकांनीं त्यांस सांगितलें महाराजास हे समजतांच त्यांनीं दसरूस व त्याची बायको मेनका ह्या उभयतांस मठांत बोलाविलें व दसरू अल्पयुषी झाल्यानें सांगितलें. तें ह्मणाले, गुरुदर्शनाचा टिटकारा करणें हें मोठें पाप आहे. परंतु तूं तें पाप केलेंस ह्मणून अल्पयुषी झालास. आजपासून तीन दिवसांनीं तूं मरशील. " मेनके, तुझा पती तीन दिवसांनीं मरणार ह्यावर तुझें

काय म्हणणें हें कळूं दे " महाराजाचे तोंडून हें शब्द ऐकतांच मेनका नांवाच्या त्याच्या बायकोस अनिवार शोक झाला ती आपले सौभाग्य मागूं लागली तेव्हां महाराज म्हणाले मेनके, कर्ताकरविता श्रीहरी आहे. तुह्मी त्याचें भजन करा व तिसरें दिवशीं जेव्हां दसरूस मरण येईल तेव्हां ह्याचें गुदद्वारानें रक्त वाहूं लागेल तें तूं बंद करून ठेव. म्हणजे पुढें हरी आहे. एवढें सांगून महाराजानें दसरूस घरीं पाठविले.

समर्थानें सांगितल्याप्रमाणें दसरू तीन दिवस फार बिमार झाला. व तिसरें दिवशीं मरण समय येतांच गुदद्वारानें रुधिर वाहूं लागलें. मेनकेने तें कपड्यानें दाबून ठेविलें तरी त्याचें प्राणोत्क्रमण झालेंच. जिकडे तिकडे आकांत होऊं लागला. कोणी महाराजास तें वृत्त कळविण्यास आले तों त्यावेळेस त्यांची समाधी लागली होती. त्यांनीं अंतर्ज्ञानानें तें सर्व जाणलें. ते त्यावेळेस यमलोकास गेले. यमानें ह्यांना पहातांच विष्णुचा अवतार ह्मणून साष्टांग नमस्कार केला व आपले सिंहासनावर बसविलें इतक्यांत यमदूतांनीं दसरूस धरून आणिलें. दसरूनें महाराजास पाहून साष्टांग नमस्कार केला व महाराजास मी चुकलों मला क्षमा करा असें तो प्रार्थूं लागला. हा कोण ह्मणून यमानें कोलबास विचारलें व हा महाराजांचा शिष्य आहे असें जेव्हां त्यास समजलें तेव्हां त्याला फार वाईट वाटलें व दुतांवर मोठा रागावला. परंतु ' हें त्यांचे

कामच आहे ' असें महाराजानें सांगून यमाची समजून केली. ह्याला आणखी २५ वर्षें आयुष्य द्या असें सांगून महाराज देहावर आले. इकडे दसरू मरण पावला हें वर्तमान लोकांनीं त्यास सांगितलें म्हणून महाराज दसरूचे घरीं गेले व अरे उठ, असा निजलास कां ! असें म्हणून त्यास हांक मारली. त्याबरोबर दसरू जिवंत झाला व महाराजाचे पायावर लोटांगण घालून त्यास स्तवूं लागला. तेव्हां तूं आणखी २५ वर्षेंपर्यंत जीवंत राहशील असा आशिर्वाद दिला. त्याबरोबर सर्वांना अत्यानंद झाला. तो वर्णवत नाहीं. दसरूचा मठ वाकोडीस अजून आहे. सारांश,

" कृतांताच्या दूता मरणसमयीं कोण फिरवी ?
कृतांताच्या दूता मरणसमयीं साधु फिरवी ॥१॥"

सापाच्या पिल्यांनां दूध पाजलें तरी तीं विषच ओकणार. महाराजानीं यमाजवळून २५ वर्षें आयुष्य वाढविलें हें दसरूला समजलेंच होतें. ह्मणून तो धापेवाडयास महाराजाचें सेवेत आणखी दोन तीन महिनें राहिला व नंतर सहकुटुंब आपले गांवांस गेला. गांवास गेल्यावर तो आसनावर बसून समाधी लावूं लागला परंतु त्याला तें मुळींच साधेना त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले परंतु सर्व व्यर्थ. त्याला मोठा राग आला व कोलबानें मला कांहीं तरी कपट विद्या शिकविली आहे, अशी त्यांची पूर्ण खातरी झाली. त्यांनीं आपल्या सर्व शिष्यांस बोलाविलें व आतां कोलबाचें

रागावळा मी आपला प्राण देतों असें त्यांना सांग लागला.

" महाराज ! गुरूवर राग करणें व्यर्थ आहे. गुरूद्रोही अल्पायुषी होतो असें आपणच आम्हांला सांगितलें व आपणच गुरूवर राग करितां हें काय ? " असें शिष्य म्हणाले तरी दसरूचा राग शांत होईना. तो हातांत खड्ग घेऊन धापेवाड्यास धांवत आला. महाराजास अगोदरच समजलें परंतु त्यानां त्यांचे कांहींच वाईट वाटलें नाहीं दसरू आलाच, त्याचे डोळे लाल भडक झाले होते. अंग लटलटा कांपत होते महाराजाला त्यांनीं बराच दोष लाविला व त्याच्या समोर आपला प्राण देणार तोंच इतर मंडळींनीं त्याची समजूत करून त्याला वाटेस लाविले गुरूवर कोपल्यामुळें त्याचे आयुष्य सर्व कमी झाले तो वाकोडीस आल्यावर त्याला सपाटून ताप आला व त्या तापाच्या वेदना असाह्य झाल्या. त्याला पुढें पश्चाताप झाला व त्यांनीं आपल्या कोलबाचें येथें तिर्थ प्रसाद व अंगारा आणण्याकरितां पाठविलें परंतु महाराज कांहींच देईनात. शिष्याचा फारच आग्रह पाहून " अरे तो केव्हांच मेला तूं अंगारा नेऊन काय करशील " असें सांगून त्यानीं शिष्यास परत पाठविलें तो दसरू अगोदरच मेला होता त्याची देहसमाधी वाकोडीस आहे.

---

# संताचा चमत्कार.

एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं, संत कोलबाजीकडे कांहीं साधु संत पाहुणे आले. त्यावेळीं दोन प्रहर रात्रीचा सुमार असल्यामुळें जिकडे तिकडे सूम झाली होती. कोलबाजी आपल्या बायकोसुद्धां मंडळीच्या पाया पडला त्याचे घर लहान तशांत कं, घरांत अन्नाचा एक दाणासुद्धां नव्हता. मुलें तर उपाशींच निजलीं होतीं. मुलें ज्या घोंगडीवर निजलीं होतीं, ती घोंगडी काढून संतास तिच्यावर बसविलें. नंतर कोलबाजीनें 'संतास भोजन घातलें पाहिजे असें आपल्या बायकोस सांगितलें. तें ऐकून बरें आहे' असें ती ह्मणाली, परंतु मोठ्या विवंचनेंत पडली, ती मनांत म्हणते. अन्न तर घरांत तिळ मात्र नाहीं व उसणें कोणीच देत नाहीं शेवटीं धैर्य धरून एकटीच बाजारांत गेली. जातांना मनांत ह्मणे कीं, जातें आहे तर खरी; परंतु जर अन्न मिळालें तर बरें, नाहीं तर सत्वाची हानी होईल. असें म्हणून राम राम ह्मणत चालत होती. ती वाणी लोकांच्या आळींत आली आणि इकडे तिकडे पहाते तों एका वाण्यास दुकानांत जातांना तिनें पाहिलें. मग ती त्याजवळ गेली आणि मधुर शब्दांनीं बोलूं लागली कीं, आमच्या येथें साधु संत पाहूने आले आहेत त्यांना जर आम्हीं

भोजन न घालतां उपाशी निजविलें तर सत्वाची हानी होईल, तर जी शिधा सामग्री पाहिजे आहे ती द्यावी. पैसे जे होतील ते मी मागाहून आणून देईन. तिच्या या मधुर भाषणानें वाणी मोहीत होऊन कामातूर झाला; आणि तिला म्हणाला; जर तूं माझे मनोरथ पूर्ण करशील तर तुला शिधा साहित्य, पैसे, कपडे, जे कांहीं तूं मागशील तें सर्व मी तुला देईन; आणि जर तूं संकोच धरीत असलीस तर परत जा. माझ्यापासून कांहींएक मिळावयाचें नाहीं. हें त्याचें दुष्ट भाषण ऐकून ती मोठ्याच विचारांत पडली, ती मनांत म्हणते, जर या वेळेस ‘ नाहीं ’ म्हणेन, तर दुसऱ्या ठिकाणीं अन्न मिळल असें दिसत नाहीं, येथून परत गेलें तर साधु उपाशीं परत जातील, तेणेंकरून सत्वाची हानी होईल. तर जसा प्रसंग पडेल तसें वागलें पाहिजे. यास्तव यास वचन देऊन आपला कार्य भाग साधून घ्यावा हेंच या संकटीं योग्य होय. असा तिनें मोठें धैर्य धरून विचार केला. अयोध्यापति जो श्रीराम, तो अंतर साक्ष आहे. त्याच्या नामस्मरणानें मोठमोठालीं अरिष्टेंही नाश पावतात. हे सर्व विचार मनांत आणून ती त्याला म्हणाली कीं, तूं मला आधीं शिधा साहित्य दे. मी मग मागाहून खचीत येतें आतां रात्र फार झाली. जर मला उशीर लागला तर साधु उपाशीं निजतील. त्या तिच्या भाषणाचा वाण्यास विश्वास पटेना. तो तिला म्हणाला, तूं जर मला वचन देशील

तर मी तुझ्यावर भरंवसा ठेवीन आणि तुला जें पाहिजे तें सर्व सामान देईन. मग तिनें धैर्य धरून त्यास वचन दिलें. व सीधा सामुग्री घेऊन ती आपल्या घरीं गेली आणि त्यांना स्वयंपाक करून वाढण्याचा तिनें बेत केला. इतक्यांत ते साधु म्हणाले तुम्ही स्वयंपाक करूं नका मग संत मंडळींनी नानाप्रकारची पक्वानें करून भोजनविधी आटोपल्यावर कोलबाजीस ह्मणाले महाराज दोन प्रहरी रात्रौ येथून भोजनास मिळून आज तुम्ही आमच्या आत्मारामास तृप्त केले तर परमेश्वरास मागणें एवढेंच आहे कीं देवाधिदेवा जगदीश्वरा आम्हा साधुसंताचे संरक्षणाकरितां अशाच सत्पुरुषाचे अवतार होत असावे.

नंतर ती कोलबाजीस एकांती बोलावून म्हणाली कीं, मी सिधा आणला त्या समयीं ज्यानें सामान दिलें, त्या वाण्यास मी वचन दिलें आहे कीं, तुझी कामेच्छा पूर्ण करीन; तर दिवस उगवण्याच्या पूर्वीं मला त्याचे मनोरथ पूर्ण केले पाहिजेत. नाहीं तर सत्वाची हानी होईल. म्हणून तेथें जाण्याला मला आज्ञा द्यावी तें ऐकून संत कोलबाजी म्हणाला स्त्रियें मीही तुझेबरोबर येतों त्या वाण्यानें आज आपणास शिधा दिला, तेणें-करून संत मंडळी जेवून तृप्त झाली. खरोखर त्याचे आपणावर महत् उपकार झाले आहेत.

तुला देखील हा उपाय बरा सुचला कीं, हा तुझा देह संतांच्या कामास लावावा. आतां पाऊस पडत असून अंधार पडला आहे, तुला भय वाटेल ? तूं

एकटी कशी जाशील ? असें बोलून कोलबाजी स्त्रीस खांद्यावर बसवून तीं उभयतां रामाचें भजन करीत करीत त्या वाण्याचे दुकानाजवळ आलीं. मग कोलबाजीनें तिला सांगितलें कीं तूं मनांत कांहींएक संकोच न धरतां त्या वाण्याचे मनोरथ पूर्ण करून ये. मी घरीं जाऊन साधूंची सेवा करीत बसतो असें म्हणून त्यानें तिला तिकडे पाठविली आणि आपण घरीं आला.

इकडे वाणी तिची वाट पहात बसलाच होता तों ती तेथें आली. तूं मला वचन दिल्या प्रमाणें आलीस. फसविलें नाहीं ह्मणून मला आनंद झाला. पाऊस पडत असतांही तिच्या पायांस चिखल वगैरे लागला नव्हतां तेणेंकरून त्यांस संशय आला. आणि तिला ह्मणाला, तुझे पाय कोरडे कसे राहिले, हा मला संशय आला आहे. तर हे स्त्रिये जी खरी हकीगत असेल ती मला सांग. संकोच धरूं नकोस किंवा असें वाण्यानें तिला विचारल्यावर तिनें उत्तर दिलें कीं, शेटजी ऐका मी सांगते तुमच्या कडून सिधा सामग्री नेल्या नंतर साधूसंतास भोजन देऊन तृप्त केलें यामुळें जे तुमचे आमच्यावर उपकार झाले ते आमच्यानें कधींही फिटावयाचे नाहीत. त्या समयीं संकटांच्या निवारणाकरितां मी तुह्मांस वचन दिलें मला पतीची आज्ञा मान्य आहे कोलबाजी माझा भ्रतार होय. मी त्याला हा सर्व वृत्तांत सांगितला. त्यानें हे माझें वर्तमान ऐकून मला आपले खांद्यावर

बसविले आणि येथें आणून सोडलें आणि आपण घरीं गेला.

आतां तुझे जे मनोरथ असतील ते तूं निःसंशय परिपूर्ण करून घे ! हें त्या महान सतीचे भाषण ऐकून तो शेट अगदीं विरघळून गेला. त्यास तात्काळ पश्चात्ताप झाला. कोलबाजी ह्मटला म्हणजे महान विरक्त, उदार, त्याच्या स्त्रीचा मी मूर्खपणानें छळ केला हें काम मीं फार वाईट केलें, असें त्याला वाटूं लागलें. प्रत्यक्ष स्त्रीस परपुरुषाजवळ नेऊन देणें हें कधीं कोणी तरी भ्रतार करील असें मला वाटत नाहीं धन्य तो कोलबाजी, धन्य ती माता ? संताची केवळ खाणच ?? ही साक्षांत आदिजननी जगदंबा होय. असा त्यानें मनाचा निश्चय केला. नंतर त्यानें तिच्या पायांवर मस्तक ठेऊन ह्मटलें कीं, क्षमा कर. आणि या बाळकाला कोलबाजीच्या पायांवर नेऊन घाल. हें त्याचें दीनवाणें भाषण ऐकून ती ह्मणाली, तुझें मन लोण्या पेक्षांही मृदु आहे असें मला वाटतें, आतां मी तुला कोलबाजीस नेऊन भेटवितें असें ऐकून त्यास फार हर्ष झाला. नंतर त्यासह ती आपल्या घरीं आली.

मग माया ममता टाकून देऊन निराभिमान होऊन वाण्यानें कोलबाजीस विनंती केली कीं, या दासाचे सर्व अपराध क्षमा करून वरदहस्त मस्तकावर ठेवा. याप्रमाणें करूण स्वरानें त्यानें कोलबाजीची प्रार्थना करून चरणावर मस्तक ठेवीलें, मग वाण्यास खरा

पश्चात्ताप झालेला पाहून कोलबाजीनें त्यास अभय वचन देऊन आलिंगन दिलें नंतर तो त्याचा दास होऊन श्रीरामचंद्राचें भजन करूं लागला."

---

# संत कृष्णा कुंभार.

विचार संपन्न जनहो ह्या कष्टप्रद दुष्ट मदिरेचे नांव ऐकून तुम्ही त्रासले असाल याकरितां आपण दुसरा मार्ग स्विकारु. प्रसिद्ध खापे येथें श्रीसंत कृष्णा कुंभार म्हणून प्रसिद्ध संत होता तो निरंतर देवाची एकाग्र अंतःकरणेंकरून भक्ति करीत होता असे असतां तरी संसारापासून दूर झाला नव्हता गुरुला शरण रिघावे असे याचे अंतःकरणांत बरेंच दिवसापासून होते. परंतु कोणी त्याला मनायोग्य सद्गुरु मिळेना, असी बरेच दिवस चिंता करीत असतां एके दिवशीं त्याचे घरीं कोणी एक विप्र आला तो निःस्सीम ब्रह्मचर्य संपन्न होता त्यानें पुष्कळ तीर्थयात्रा केल्या होत्या, तो पांडु-रंग क्षेत्र निवासी होता कृष्णा कुंभारानें त्याची सुव्यवस्था केली व आपण कुठें जाणार असा त्याला प्रश्न विचारला तेव्हां ब्राह्मणांनीं सांगितले कीं मी श्री-रामटेकावरून आलों आहे व आतां धापेवाड्यामध्यें कोणी कोलबाबोवा ह्मणून दर्शनीय सत्पुरुष आहेत

त्यांची भेट घेण्याची आहे असें तो ब्रम्हचारी बोलला हे त्याचे भाषण श्रवण करून कृष्णा कुंभारास फारच आनंद झाला. व त्याच्या मनांत आले कीं अशा माहात्म्याला आपण जरूर गुरु करावा म्हणून त्या ब्रम्हचारी बोवाबरोबर दुसरे दिवशीं घापेवाडयास आला संत कोलबाबोवानीं ब्राह्मणास साष्टांग नमस्कार करून त्याची भोजनाची व्यवस्था केली कोलबाबोवानें कृष्णा कुंभाराचे हृद्गत जाणले व कृष्णा कुंभारानेंही साष्टांग दंडवत केले तेंव्हां थोडया हास्यकारक भाषणानें आपल्या शिष्याची खऱ्या स्वरुपाची परिक्षा पाहून कांहींच आढेवढे न घेतां त्याचा उद्धार केला कोलबाचे शिष्य समूहात कृष्णा कुंभार हाच श्रेष्ट होता. कोलबाबोवाचे अंतःकरणांतील विचार ह्यास कळत असे. एके दिवशीं सर्व मंडळी आंत बसली असतां आपण बाहेरील ओट्यावर थोडी विश्रांती घ्यावी अशी कोलबाबोवाचे मनांत आले. व ते कोणास कळविलें नाहीं तरी कृष्णा कुंभारानें लवकर बाहेर जाऊन जागा स्वच्छ केली व तेथें एक गादी आंथरून दिली कोलबा त्यावर येऊन बसले व विचारते कीं कृष्णा तुला आंथरण्याकरितां कोणी सांगितले होते ? तेंव्हां तो म्हणाला महाराज हे आपलेच कृपेचे फल आहे.

सर्व मंडळी बाहेर बसली असतां एकाएकी आकाशांतून कोंबडीचे पिले गरूडपक्षाच्या पंजातून सुटून

मंडळीच्या समोर अर्ध मेलेली पडली. त्या पिलांची दया येऊन शिष्य मंडळी त्यांच्या संरक्षणार्थ धावू लागले परंतु संत कोलबाजी म्हणाले ज्या परमेश्वरानें त्यालां गरूडपक्षाच्या पंजातून सोडविले तोच इतर प्राण्यापासूनही रक्षण करील. इतक्यांत एक मांजर व कुत्रें त्या पिलाकरितां भाकरीचा तुकडा व पाणी घेऊन आले त्या पिलाजवळ कोणी गेल्यास कुत्रें व मांजर त्यांचे संरक्षण करी त्या दोन पिल्यांपैकीं एक कोंबडा मोठा झाला तो कोलबाचे घरी रहात असे. त्यावर कोलबाही प्रेम करीत असे.

कोणे एके दिवशीं त्यांचा प्रल्हाद नामक शिष्य चंद्रभागेंत स्नान केल्यावर गुरु दर्शनास आला आणि मठांतील कोंबडा बाहेर हाकूं लागला. तो कोंबड्यास राग येऊन त्यानें प्रल्हादाच्या पायाला टोचलें व पाय फार दुखावला. तरी प्रल्हादानें दर्शनास जाऊन महाराजानां ही हकीकत कळविली कोलबाजीनीं प्रल्हादाच्या पायावर नजर फेकतांच पाय बरा झाला व त्याला तो कोंबडा व ती मांजरे घेऊन जाण्यास सांगितलें.

त्यांच्या शिष्य वर्गापैकीं कृष्णाजी कुंमार हे पट्ट शिष्य होते. त्याना कोलबाजीनें आपले सामर्थ्य व चमत्कार प्रगट न करण्याविषयीं आज्ञा केली कृष्णाजी समर्थाला अनुसरून वागत असे.

एके वेळीं खाप्यांत पटकीचा भयंकर आजार उत्पन्न झाला आणि लोक मृत्युमुखीं पडूं लागले. अशी लो-

कांची वाईट स्थिती पाहून दया उत्पन्न झाली कृष्णाजीनें लोकानां सांगितलें कीं तुम्हीं निरंतर संत कोलबाजीचे नामस्मरण करित गेल्यास त्याच्यापासून तुमच्या दुःखाची निवृत्ती होईल. आणि कोलबाजीच्या कृपेनें उद्यापासून उपद्रव बंद होईल. दुसरा दिवस येतांच उपद्रव एकदम बंद झाला व लोकानां आश्चर्य वाटले व कोलबाजी विषयीं मनांत प्रेम उत्पन्न होऊन धापेवाड्यास त्यांचे दर्शनास जावूं लागलें. कृष्णाजीचे सामर्थ्य कोलबाना कळतांच त्यांनीं कृष्णाजीना सांगितलें कीं तुह्मांस यम लोकातच रहावें लागेल कारण तुह्मीं आपले सामर्थ्य प्रगट करून तुह्मीं आपले पुण्याचा क्षय केला.

कांहीं दिवसांनीं कृष्णाजीचा एकुलता एक कान्होबा नावाचा मुलगा बिमार होऊन मरण पावला. लोकांनीं त्याला जिवंत करण्याविषयीं कृष्णाजीस प्रार्थना केली. परंतु कृष्णाजीनें सांगितलें कीं परमेश्वरच आपणावर कोपला आहे. आज किंवा उद्या केव्हां तरी कान्होबा मरणारच होता कारण हा मनुष्य देह नाशीवंतच आहे. आज कान्होबा मेला कांहीं दिवसांनीं आपणापैकींच कोण मरेल याचा नियम नाहीं म्हणून कान्होबास जिवंत करण्यांत फायदा नाहीं हे कृष्णाजीचे भाषण ऐकून प्रेतास दहन क्रिया दिलीं. कृष्णाजीचेही मरण समीप आले होते. मरण्याचे पूर्वी त्यांनीं कोलबाजीचे दर्शनास जावून चरणी लोटांगन घालून मुक्तीकरितां प्रार्थना करूं लागळे. परंतु कोलबाजीनें

तुला कांहीं दिवस यमलोकीच रहावें लागेल असे सांगून त्याला खाप्यास जाण्यास निरोप दिला. निरोप दिल्या-वर कृष्णाजी वाकोडीस गेले व ते आपला गुरुबंधू गोंदबा शेट्या याना बरोबर घेऊन खाप्यास आले. मठाची सर्व व्यवस्था गोंदबाकडे सोपवून आपण घोंग-ड्यावर बसून समाधी घतली. इतक्यांत त्यांच्या पत्नीनें येऊन त्यांचे पायावर डोकें ठेविलें व देह विसर्जन केला. गोंदबा शेट्यानें त्यांच्या समाधी त्याच जागेवर केल्या ह्या समाधी खापे येथें अझून कायम आहत. कृष्णाजीची व कान्होबाची व त्यांच्या पत्नीची यमलो-कांत भेट झाली. यमानें त्यांचा चांगल्या रितीनें आदर सत्कार केला व ह्या पुण्यवान दापलेकांची उत्तरद्वारी योजना केली इकडे कोलबा आपल्या शिष्यांना कृष्णा-जी व कान्होबा हे अझून यमलोकीच आहेत आणि याचा चमत्कार तुम्हाला लवकरच घडून येईल असे सांगत. खाप्यांत पांडु नावांचा एक सधन कोष्टी रहात होता तो आपल्या घरचा खाऊन पिऊन बरा होता त्याला एक मुलगा व एक मुलगी होती. त्या मुलीचे नांव यमुना होतें, हिला एके दिवशीं ठेंच लागून ती मरण पावली. त्याच दिवशीं यमुना नावाची दुसरी कोष्टीन मरणार होती परंतु यमदुतानें तिला सोडून हिलाच ओढून नेलें. यमाजीनें निकाल करतानां असें सांगितलें कीं या यमुनेचे आज मरण नाहीं ह्मणून इला सोडून द्या व दुसऱ्या यमुनेला पकडून आणा

असा हुकूम केला. हिला यमलोकी सोडून दिल्यावर वाट सुचेना व ती इकडे तिकडे सैरावैरा भटकूं लागली. भटकतां भटकतां या बापलेकांची भेट झाली यमुनानें कृष्णाजीस पाहतां चरणी साष्टांग नमस्कार केला. व विनंती केली कीं मला यमदुतानें सोडून दिले तर मला माझे घरीं जाण्याची वाट दाखवा. परंतु आषाढीचा दिवस जवळ आल्याकारणानें कृष्णाजीनें यमुनेचे हातांत तुळशीफुलें व नैवेद्या-करितां एक फल देऊन गुरूस अर्पण करण्यास सांगि-तलें. नंतर कृष्णाजीनें तिला वाट दाखवून खाप्यास पोंचवून दिलें इकडे पांडुला एकाएकी लाडकी मुलगी मरण पावल्यानें दुःख झाले परंतु ईश्वरी इच्छे-विरूद्ध कांहीं चालत नाहीं असे समजून तिची तयारी केली व तिला शिडीवर बांधून स्मशानांत नेले इतक्यांत ती एकदम झोपेंतून जागीं झाल्यासारखीं खडबडून उठली त्या सरिसे लोक पिशाच्य पिशाच्य ह्मणून ओरडत पळूं लागले परंतु यमुनानें ही लोकांची गाळण उडालेली पाहून हंसून लोकांना धीर देवूं लागली आणि ह्मणाली कीं मी भूत नव्हे भिऊं नका मी तुमची यमुनाच होय मला येथें कृष्णाजीनें आणून दि-लें. व तिनें सांगितले कीं मला येथुन सोडावा आणि हीं माझ्या हातातली कृष्णाजीनें दिलेली पूजा घेऊन कोलबाजीकडे जा. मंडळी तिच्या मुठीं सोडूं लागले परंतु त्या सुटेना ह्मणून मंडळीनी तिला धापेवाड्यास

आणून कोलबाजीचे पायावर लोटले कोलबाजींनें तिच्या मुठीकडे पाहतांच एकदम मुठी सुटल्या नंतर तिनें तुळशी-फुले कोलबाजीचे डोक्यावर टाकले आणि यथासांग पूजा केली आणि नैवेद्यही दाखविला यमुनानें कोलबाजीला सांगितले कीं मला कृष्णाजी व कान्होबा हे यम-लोकांत मिळाले व त्यांनीं ही पूजा देऊन आह्मी सुखरूप आहोंत असा निरोप पाठविला. त्या शिडीवर कणकिचा पुतळा ठेऊन ते प्रेत स्मशानांत दहन करण्यांत आले. अजून कोलबा महाराजाच्या कृपेनें कृष्णाजीच्या मठाची व्यवस्था उत्तम चालली असून सदाव्रत सुरू आहे.

---

# संताचे चरित्र.

उमरेडला शिवबा नावांचा एक कोष्टी रहात असे. शिवबाला अगदीं लहानपणापासन ईश्वराची फार भक्ती होती, आणि तो नेहमीं आपण या भवसागरांतून कोणच्या रितीनें तरून जाऊं याचा विचार करीत असे. त्या वेळेला कोलबाची कीर्ती त्याचें कानांवर येऊं लागली व त्यानें जाणले कीं हेंच समर्थ आपला तरूणोपाय करण्यास योग्य होतील नंतर त्यानें सर्व पाश सोडून एकदम धापेवाड्यास येऊन मंत्रोपदेश

घेतला. आणि कांहीं दिवस धोपेवाड्यास राहिले. नंतर कांहीं दिवसांनीं लोक कल्याणार्थ उमरेडला आले येथें यांचा महिमा फार वाढत चालला. एके दिवशीं लोखंडे या घराण्यांतला एक कर्ता सवरता पुरुष मरण पावला. त्याच्यानें घरचीं मनुष्यें फार शोकाकुल होऊन एकच कल्होळ करूं लागलीं त्या वेळेला त्यांचा शोक फार अनिवार होता. एखादा कसाही पाषाण हृदयाचा मनुष्य असला तरी तो शोक ऐकून त्याचाही गळा भरून येत असे. बरें असो ईश्वर इच्छेपुढें इलाज नाहीं. ज्या वेळेला ते त्याचे प्रेत शिवबाच्या मठावरून चालले त्या वेळेला शिवबाचे कानीं हा हृदयद्रावक शोक ऐकूं आला आणि त्या शोकानें त्याच्या मनांत दया उत्पन्न करून त्याला कृपा करावीसी वाटलीं मग काय पहावयाचे " आपणा सारिखे करिती तात्काळ तया काळ वेळ कांहीं नसे. "

लगेच त्यानीं ते प्रेत तेथें थांबविलें व अंतर ध्यानानीं सद्‌गुरूचे स्मरण केलें. सद्‌गुरूने दृष्टांत दिला कीं तूं त्या जगतचालक प्रभूचा धांवा कर ह्मणजे तो तुला ह्या संकटापासून सोडवाल मग गुरू आज्ञेवरून त्यानें ईश्वराचा धांवा केला. ईश्वरानें असा दृष्टांत दिला कीं तू त्या प्रेताचे मुखांत माझे तीर्थ घाल ह्मणजे ते प्रेत सजीव होईल. त्यानें तसे केल्यावर प्रेत एकदम झोपेतून जागे झाल्यासारखे खडबडून उठले व सर्वांना आनंद झाला. तिथेंच दानधर्म वगैरे करून त्या शिडी-

वर कनकेचा पुतळा ठेऊन ती शिडी स्मशानांत दहन करण्यांत आली. हे लोखंडे नावाचे घराणें उमरेडला अजून कायम आहे.

धापेवाड्यास भीकु सेट्या नावाचा कोष्टी रहात असे तो कोलबाजीचा शिष्य होता. त्याला एकच मुलगा होता. त्याचे नांव कान्हु हे होते कान्हु हा फारच सुस्वभावाचा होता आणि त्याला लहानपणापासून ईश्वरभजन व त्याची कोलबावर भक्ती फारच असे. तो त्या वेळेला ४—५ वर्षाचा होता तेंव्हां त्याचे बोबडे बोल व बाललीला व त्यातल्या त्यांत लहान मुलांस ईश्वराची भक्ती आहे असे पाहुन कोलबाही त्याचेवर प्रेम करीत असे.

कान्हु जसजसा मोठा होत चालला तसतसे त्याचे ईश्वरावरचे प्रेमही वाढू लागले व तो मोठा ईश्वरभक्त होईल असे लोकांस वाटले. कान्हु मोठा झाल्यावर त्यानीं दोन बायका केल्या. व पुढे कांहीं दिवसानीं अचानक दोषीक बिमारी होऊन तो एकाएकी मरण पावला. भिकु हा श्रीमंत असल्याकारणानें मरणाचे अगोदर पुष्कळ औषधोपचार केले परंतु होणार गोष्टी पुढे कांहीं चालत नाहीं या न्यायानें त्यांचे कांहीं चालले नाहीं व यमाजीची दुतांना शेवटची आज्ञा होण्याबरोबर ते त्याला घेऊन गेले. त्याचे प्रेत दहन करण्याकरितां वेटाळी पाटाळी आप्त, ईष्टमित्र वगैरे सर्व मंडळी गोळा झाली, कान्हुच्या दोघांही बायका

सती जाण्यास तयार झाल्या. त्या मंडळींत महाराजांचा काशीनाथ नावाचा धाकटा मुलगाही होता. त्यानेंही सर्वांची दुःखद स्थिती पाहून त्यांचे मन कळवळलें आणि भिकुस सांगितलें कीं तू आतां ह्या वेळीं संताना शरण जा आणि भक्तिपुर्वक त्यांचे पाय घट्ट धरून ठेव ह्मणजे तुझा तरणोपाय होईल. असा मंत्रोपदेश केल्यावर मग त्यानें एकदम कोलबाजीचे चरणावर साष्टांग नमस्कार घातला आणि त्यानां म्हणू लागला कीं महाराज माझा ईथून वंश खुंटत आहे. माझा एकुलता एक मुलगा मरण पावला आहे आतां मजवर तुम्हीं दया करा.

हे त्यांचे पुत्रप्राप्तीचे निस्सीम प्रेम व ईश्वरावरची भक्ती पाहून कोलबानें भिकुला उठविले आणि म्हणाले तूं कशाला विनाकारण शोक करून मृत मनुष्याची आशा धरितो. मनुष्याला जन्म व मरण हे लागलेंच आहे. आज तो मेला उद्या तू मरशील परवा आम्हीं मरूं तू मला माझ्या मुलाला जीवंत कर असे जो म्हणून राहीला तर मी कांहीं वैद्य किंवा मी ईश्वर नाहीं मरणापासून मुक्त करण्यास ईश्वरावाचून कोणी सुद्धां समर्थ नाहीं.

भिकु—महाराज कदाचित इश्वर सुद्धा समर्थ नसेल पतुंर आपल्या सारिखे महंत योग्य आहेत. महाराज आपण काय कारण्याला समर्थ आहा. याचा कोणिच अंत पाहिला नाहीं तर माझी शेवटची ऐवढी

विनंती आहे कीं माझ्या मुलाला जिवदाण द्या.

कोलबा—मी जर तुझ्या मुलाला उठविले तर तु त्या बदला काय देशील.

भिकु—महाराज मी आपल्या सारख्या संताला काय देण्यास समर्थ आहे. मजजवळ एका भक्ती शिवाय दुसरे देण्यास कांहीं नाहीं आपणास पैशाची गरज असती तर मी तुम्हांस वाटेल तितका पैसा दिला असता. नंतर कोलबानें भिकुला विभुती व तीर्थ देऊन सांगितलें कीं तीर्थ त्याला पाजून दें व विभुती तोंडाला लाव आणि एकसारखे प्रेमयुक्त भजन चालू दे म्हणजे कांहीं वेळानें तुझा मुलगा जीवंत होईल.

भिकुनें विभुती व तीर्थ घेऊन मुला जवळ आला आणि तीर्थ पाजले व विभुती तोंडाला लाविली. व सर्व मंडळी मिळून भजनास सुरुवात केली महाराजांचा धाकटा मुलगा काशीनाथ हा भजन मंडळीच्या मध्यें ऊभा राहिला आणि बाकीची मंडळी बाजुला उभी राहिली टाळ टिपऱ्या मृदंग घेऊन भजनास सुरुवात झाली मग काय तो थाट विचारावा एक सारिखे ५–७ घटका भजन चालले नंतर मुलानें कड फेरला. मग सर्व मंडळींनीं कान्हुस उचलून महाराजाचे पायावर टाकले नंतर तो चांगला शुद्धीवर येऊन सुरळीत बोलूं लागला. सर्व मंडळीला फारच आनंद झाला. कान्हुच्या आईबापाचा आनंद तर विचारावयालाच नको मग भिकुनें दान धर्म सप्ता वगैरे करून गावाला भोजन देऊन

मोठा समारंभ केला.      ५०१

# कुष्ट गेले.

वऱ्हाडात एक रामभट नावाचा वेद शास्त्र संपन्न ब्राह्मण रहात असे तो ब्राह्मण फार धर्मशील व पुण्यवान होता. परंतु त्याच्या मागील पापामुळें त्याचे सर्व शरीरावर कोड फुटलें होतें, रामभटानें ते कोड जाण्याकरितां पुष्कळ औषधोपचार केले, परंतु कांहींएक गुण आला नाहीं. असाच तो तिर्थ यात्रेला जात असतां एका गृहस्थानें सांगितलें कीं देवलवाडा येथें एक शीवलींग आहे त्याची पुजा कर ह्मणजे तुझे कोड नाहींसे होईल. मग तो वऱ्हाडांतून निघून दक्षिणेंतील देवलवाडा या गांवीं आलों तेथें त्या शीवलींगाजवळ रामभटानें अनुष्टान मांडले; आणि त्यानें पराकाष्टेची मनापासून भक्ती केली. त्या योगानें शीव प्रसन्न होऊन रात्रौं दृष्टांत दिला कीं मी तुजवर प्रसन्न झालों आहे जे मागण्याचें असेल ते माग रामभटानें माझे कोड जावे असा शंकरास वर मागितला शंकरानें उत्तर दिलें कीं रामभटा तुला जर कोड जाण्याची ईच्छा असेल तर महाराष्ट्रांत नागपूर ह्या नांवाचें एक मोठें शहर आहे त्या नजीक धापेवाडा तेथें कोलबा नांवाचे

संत रहात असतात. तेथें तू जाऊन त्यांचा प्रसाद ग्रहण कर म्हणजे तुझे कोड नाहींसें होईल.

असे स्वप्न पडताच रामभटास फार आनंद झाला आणि पहाटेस झोपेतून जागा झाल्यावर स्नान संध्यादि सर्व कर्म आटोपले व दुपारी धापेवाड्यास येण्यास निघाला. मजल करीत करीत धापेवाड्यास आला व कोलबाजींचे इथें त्यानें बिऱ्हाड ठेविले. नंतर कोलबाजींनें ब्राम्हणास सीधा सामुग्री देऊन स्वयंपाक करण्यास ब्राम्हणास विनंती केली. रामभटानें ती विनंती मान्य करून चंद्रभागेवर स्नान करण्यास गेला, तिथें स्नान संध्या वगैरे करून मठांत येऊन स्वयंपाकास सुरुवात केली. सर्व स्वयंपाक आटोपल्यावर ब्राह्मणानें भोजन केलें. भोजन झाल्यावर रामभट कोलबाकडे जाऊन शिवाज्ञा निवेदन केली, आणि प्रसाद मागूं लागला. कोलबाजी म्हणाले रामभटजी मी कांहीं वैद्य नाहीं, ईश्वर नाहीं, अथवा संत नाहीं तर माझे हातून तुमचा रोग कसा जाऊ शकेल. रामभटानें पुन्हां महाराजाना शिवाज्ञा निवेदन केली महाराज तुम्हीच या रोगापासून मला मुक्त करण्यास समर्थ आहा. ईश्वर सुद्धां तुमचा अंकीत आहे. मग महाराजानें अंतरज्ञानानें जाणिले कीं ह्या ब्राम्हणावर शंकर प्रसन्न होऊन त्यानींच ह्याला मजकडे धाडीले आहे तर त्याची आज्ञा मला सिरसावद्य आहे असे समजून त्यानें रात्री रामभटास प्रसाद देण्याचे कबूल केलें.

रात्री भजनास सुरुवात झाली भजन फार धडाक्याचे चालले, जिकडे तिकडे आनंद झाला दोनप्रहर रात्र झाल्यावर कोलबाजींनें भजन बंद केले भजन बंद झाल्यावर प्रसादाचा समारंभ चालला. कोलबाजींनें स्वतः रामभटास बोलावून प्रसाद दिला आणि सेवन करण्यास सांगितला. रामभटास प्रसाद मिळाल्याबरोबर फारच आनंद झाला व आता माझ्या जन्माचे सार्थक झाले असे ह्मणूं लागला. महाराजाची आज्ञा शिरसावंद्य समजून रामभटानें प्रसाद सेवन केला प्रसाद सेवन केल्याबरोबर त्याचे जेवढे ह्मणून पूर्व जन्माचे पाप होते तेवढें जळून भस्म झाले, त्याच्यानें त्याचा तो रोग नाहींसा होऊन त्याचें शरीर चांगले झाले. मग त्याला फार आनंद झाला.

कोलबाजीजवळ रामभट कांहीं दिवस होते व तिथून निघून वऱ्हाडांत आले त्या वेळेला पटकीची बिमारी सुरु होती. कोणाचे तरुण मुलें कोणाच्या स्त्रीया, कोणाच्या मुली मेल्या, यानें लोक फार घाबरून गेले होते. इतक्यांत रामभट तेथें जाऊन पोहोंचले आणि ती सर्वांची वाईट स्थिती पाहून सांगू लागले कीं तुह्मीं धापेवाड्यास कोलबाजी सत रहातात त्यांना नवस करा म्हणजे तुमचे मागचीही सर्व पिडा नाहींशी होईल. परंतु लोकांचा कांहीं विश्वास जमेना. लोकांचा विश्वास जमत नाहीं असें रामभटानें पाहून आपली सर्व घडलेली हकीकत मंडळीला निवेदन केली, नंतर

त्या बोलण्यावर मंडळीचा विश्वास जमून लोक एकदम कोलबानां नवस बोलू लागले त्याच्यानें गांवातील एकदम सर्व रोग बंद झाला मग काय विचारतां लोक आपापल्या दुखांत जरी होते तरी त्यानां आनंद झाला कोलबाच्या दर्शनाची इच्छा होऊ लागली.

वऱ्हाडावरून पुष्कळ मंडळी कोलबाचे दर्शनास येऊं लागली आणि आपले नवस फेडले. धापेवाड्यास कांहीं दिवस यात्राच भरली होती. जागजागीं कीर्तनें, भजनें, पोवाडे व ब्राम्हण भोजनें होत होती. बहुतेकांनीं कोलबाजीचा मंत्रोपदेश घेतला. नंतर मंडळी कांहीं दिवस तेथें राहून कोलबाजीचा निरोप घेऊन वऱ्हाडांत आली.

कोलबानीं आपल्या प्रल्हाद नामक शिष्यास मांजर घेऊन जाण्यास आज्ञा केली हे मागें सांगितलेंच आहे प्रल्हाद मांजर घेऊन गेल्यावर त्याच्या घरीं ती मांजर मोठी झाली. मोठी झाल्यावर त्या मांजरीला पिलें झाली. प्रल्हादाचे घराजवळ एका कुंभाराचे घर होते. त्यांनीं मडके तयार केल्यावर त्याला भाजण्याकरितां आवा लावला. त्या आव्यामध्यें मांजरीचे पिलें होती. ती मांजरीचे पिलें सर्व जळून जातील म्हणून त्याला परम दुःख झालें मांजर तर आव्यापासून दूर जाईना. तेव्हां प्रल्हाद कपाळावर हात मारून ऊर बडवून घेऊं लागला. आणि स्त्रीस म्हणाला कीं माझ्यापासून एक मोठा अन्याय घडला आहे, तो हा कीं, मांजरीनें आपली

पिलें ज्या मडक्यांत ठेविली होती ते मडकें चुकून आव्यांत भाजण्याकरितां गेले आतां आवा रचून पेटविला आहे. ती पोरें जळून जातील, म्हणून मला परम दुःख झालें आहे तर आतां काय करावें असें म्हणून त्यानें धाडकन जमिनीवर आंग टाकलें. तें पाहून त्याची स्त्रीही मुर्छीत पडली. मग ती सावध होऊन ह्मणते हे गुरूवर्य कोलबाजी, या संकटापासून आमची सोडवून करा.

मांजरीची पोरें जीवंत असु द्या. मग ती भ्रतारास म्हणाली कीं हें संकट निवारण होण्यासाठीं आपल्या गुरुचा धावा करा प्रल्हादानें त्यावेळीं गुरुचे स्मरण केलें त्याच्या अंतर्यामी हे दुःख त्यांस एकसारखे टोंचत होते ती उभयतां करुण स्वरानें कोलबाचे स्तवन करीत होती. तिसरे दिवशीं आवा भाजून झाल्यावर मडकी दिसू लागली ती उभयतां तीन दिवस पर्यंत तेथेंच अन्न पाण्यावांचून होती मांजर एकसारखीं रडत होती तों आव्यातून मांजरीच्या पिल्याचा ऐकू आलेला शब्द त्यांचे कानीं आला मग त्यास आनंद झाला. आाणि कोलबा आपल्याला पावले असें त्यांना वाटलें.

# गोंदबाला मिळालेला प्रसाद.

कोलबाचे आज्ञेप्रमाणें दर मंगळवारीं कोंडबा ललीत करीत असे परंतु कोंडबा मरण पावल्यादर ते काम एका हरिदासाकडे सोंपविण्यांत आले असाच पुष्कळ दिवस क्रम चालला. एके दिवशीं हरीदास मंगळवारी कीर्तनास आले नाहींत त्यांना पुष्कळ बोलावणें पाठविले तरी त्यानें विनंती मान्य केली नाहीं. आतां मंगळवार सुना पडतो म्हणून कोलबानें गोंदबाला आज तू कीर्तन कर म्हणून सांगितलें.

गोंदबा—मला गाणें वगैरे कांहीं येत नाहीं ताल सुराचा तर पत्ताच नाहीं, गीता ज्ञानेश्वरी कधीं वाचलीही नाहीं, व संस्कृत कसें म्हणून ठाऊकही नाहीं, तर मी कीर्तन कसें करूं.

कोलबा—तूं भिऊं नको ईश्वराचे गुणानुवाद गावयाला ताल सूर तबला तंबुरा यापैकीं कांहींएक लागत नाहीं. कोलबानें त्याच्या मस्तकावर हात ठेवून तूं आज कीर्तन खुशाल कर म्हणून सांगितलें मग तो कीर्तनास उभा राहिला सद्गुरूची कृपा झाल्यावर मग कीर्तनाचा थाट काय विचारावा. एकसारखें दिवस निघेपर्यंत कीर्तन चाललें. परंतु कोणास झोंप आली नाहीं. पुढें दर मंगळवारीं गोंदबाच कीर्तन करीत असे. कोलबाजीनें गोंदबास सांगितलें कीं तूं जेथें जेथें म्हणून कीर्तन

करशील तेथें पैसे घेऊं नको. गोंदबा मोठा कीर्तनांत प्रवीण झाला.

# कोलबाचे मरण.

एके दिवशीं कोलबा आपल्या शिष्य वर्गासह बसले असतां म्हणाले कीं मी आणखी ९ वर्षांनीं वैकुंठास जाणार आहों तर तुम्हाला जे कांहीं करवून अथवा करून घ्यावयाचे असेल ते करावें. शिष्य वर्गास कोलबा आपल्याला सोडून जाणार याचा फार खेद झाला परंतु समाधान करून कोलबाजींनें सांगितलें कीं तुम्हीं खेद करूं नका. जरी मी जाईल तरी कांहीं हरकत नाहीं नेहमीं मी तुमच्या जवळच आहों. कोलबाजी ९ वर्षांच्या ठिकाणीं ६ वर्षे राहिले आणि नंतर शिष्य वर्गास म्हणाले कीं तुम्ही मला आतां जाऊ द्या. मी आतां इथून ३ दिवसांनीं सोमवारीं जाणार आहों ही बातमी सर्व शिष्यास समजण्या-बरोबर त्यांनीं सारखा ३ दिवस उत्सव करून भजन समारंभ केला. सोमवारीं पहाटेपासून जी भजनास सुरुवात झाली ती कोलबाजीस जात पावेतों होती. सर्व मंडळी त्या समारंभात जेवण खावण वगैरे सर्व सोहळे विसरून जाऊन भजनात गुंग झालेली होती. सायं-

काळ समीप येण्याबरोबर कोलबाजी करितां विष्णुकडून दिव्य विमान आले तें कोलबानें पहातांच त्यानां साष्टांग नमस्कार केला. विष्णुचे दुतानें त्यानां साष्टांग नमस्कार करून विनवूं लागले कीं महाराज हे आम्हीं आपल्या करितां विमान आणले आहे याच्यात तुम्ही बसावे ह्मणजे आम्ही तुम्हांस वैकुंठ लोकांस श्रीविष्णुचे दर्शनास घेऊन जातो.

कोलबाजीनें विचार केला कीं आतां आपण वैकुंठ लोकांस जाऊन रहावें. मग सर्व शिष्य समुदायास आशिर्वाद देऊन आपण विमानांत विराजमान झाले ज्या वेळेला ते विमानांत बसले त्या वेळला त्याचें डोक्यावर तेजःपुंज श्रीविष्णुचा सुवर्ण मुकुट शोभत होता व चार हात दिसत होते

ईकडे भजनाचा फारच कडाका चालला होता मठात कोलबा समाधिस्त पडले होते त्या वेळेला एका वाईट विचाराच्या व कुत्सित बुद्धिच्या मनुष्यानें म्हटलें कीं आतां ह्या प्रेतापुढें भजन करण्यांत काय अर्थ आहे. असें म्हटल्याबरोबर कोलबानें डोळे उघडून त्या मनुष्याकडे पाहिले. पाहिल्याबरोबर तो मनुष्य घाबरला आणि लटलटा कापून क्षमा मागुं लागला. तेंव्हां महाराजानें डोळे मिटले. मग तोही गृहस्थ भजन करूं लागला भजन आटोपल्यावर कोलबाजीची तिथेंच समाधी करण्यांत आली. व पुष्कळ दान धर्म होऊन समारंभ आटोपला.

कोलबाजी मेल्यानंतर त्याच्या मठाची व्यवस्था कोण चालविणार यांचा शिष्यवर्गांना विचार उत्पन्न झाला. पुष्कळ भवती न भवती करून अखेर त्यांचा धाकटा मुलगा काशीनाथ याला त्यांचे गादीवर बसविण्याचे ठरले वास्तविक पहातां गादीवर बसण्यास वडील मुलाचा हक्क पोंहचतो परंतु वडील मुलगा दुराचारी, दुर्व्यसनी, आणि ईश्वरभक्त नसल्यामुळें त्याला गादीचा मान देण्याविषयीं मंडळीनें नाकारले. काशीनाथ हा लहानपणापासून सुस्वभावाचा होता हें मागें दिलेलीच आहे.

मंडळींनीं काशीनाथाला गादीवर बसविले हे पाहून महाराजांचा वडील मुलगा बापूजी यांच्या मनांत काशीनाथाविषयीं द्वेशभाव उत्पन्न झाला आणि बापुजीनें वडील मुलगा कायम असतांना धाकट्याला गादी कां मिळावी असा प्रश्न मंडळीसमोर मांडला. आणि मंडळीला सांगितलें कीं तुह्मी हा अन्याय केलेला आहे; तर मी नागपुरास जाऊन राजदरबारी फिर्याद करतो.

कोलबाजीचे घरी बापुजी हेंच घर चालविणारे आणि पैसे मिळविणारे होते. लोक धाकटा बंधु काशीनाथ यांचीच पुजा करितात आणि मला कांहींएक मान मिळत नाहीं हें पाहून तर त्यांच्या मनांत अगदींच वाईट वाटले, आणि त्यानें विचार केला कीं मीच पैसे मिळविणारा व सर्वांला खाऊं घालणारा मनुष्य आहे. जर मी परगांवीं जाऊन राहिलों किंवा कोठेंही निघून

गेले यांना उपासमार पडतील अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली म्हणून तो तिथून निघून नागपुरास येऊन राहिला. इकडे कोलबाजीचा मठ फारच लहान असल्याकारणानें काशीनाथाला तो मोठा करण्याची इच्छा उत्पन्न झाली. परंतु पैसे कोठून आणावेत ह्या विवचनेंत तो पडला. ही बातमी गावांत कानोकानीं पसरतांच एका श्रीमान ब्राह्मणाचे ऐकण्यांत आल्याबरोबर तो एक हजार रुपये घेऊन काशीनाथाचें घरीं आला आणि काशीनाथाला ह्मणूं लागला कीं हे रुपये घेऊन मठास सुरुवात करावी. परंतु काशीनाथ हा ब्राम्हणाचे पैसे घेईना. तेव्हां मोठ्या मुष्कीलीनें काशीनाथानें पैसे उसने घेतले आणि आईला विचारून मठाचे कामाला सुरुवात लावली. कामाला सुरुवात लागल्यावर अर्धे निर्धे काम आटपत नाहीं तोंच नागपुराहून बापुजी आले आणि त्यांनें हा उचललेला समारंभ पाहून त्यांच्या मनांत काशीनाथाविषयीं द्वेश उत्पन्न झाला आणि आईस ह्मणूं लागले कीं आह्मीं आपला देह झिजवून पैसे मिळवावें व ह्यांनीं ते सर्व खर्च करावे हा न्याय कुठचा, बापुजीच्या मनांत वेगळे होण्याचें आलेंच होतें त्यांत आणखीही भर पडली. त्यांच्या मनाचा फारच असंतोष होऊन ते नागपुरास सहकुटुंब येऊन राहिले. बापुजी नागपुरास आले ते स्वस्थ बसले नाहींत त्यांनें राजदरबारच्या मंडळीची सल्ला घेऊन काशीनाथावर गादी मिळण्यासंबंधाची

फिर्याद केली त्या फिर्यादीचा मुद्दा असा होता कीं वडील मुलास गादी न मिळतां धाकट्या मुलास कां मिळावी व राजेसाहेबाच्या दरबारांत हा अन्याय आहे असें ठरविल्यावर काशीनाथास ५० रुपये दंड केला. आणि दुताला सांगितलें कीं तूं दंडासह काशीनाथाला नागपूर मुक्कामीं घेऊन ये त्याप्रमाणें राजाज्ञा घेऊन दूत एकदम धापेवाड्यास आले व हुकूम काशीनाथाचे पुढें टाकला काशीनाथानें हुकूम पाहिल्याबरोबर राजाज्ञा अमान्य न करितां दुताजवळ ५० रुपये दंड दिला नंतर दूत दंड व काशीनाथाला समागमे घेऊन नागपुरास आले काशीनाथ नागपुरास आल्यावर त्यांनीं विचार केला कीं आपण राजदरबारीं जाण्याचे अगोदर संताचे दर्शन घ्यावे अशी इच्छा उत्पन्न झाली नंतर त्यांनीं कोठें न जातां अचल ब्रम्ह नावाच्या ब्रम्हचारी बोवाकडे जाण्याचा विचार केला व ते त्यांच्याकडे दर्शनास गेले. सर्व खुशालीचे प्रश्न विचारणें झाल्यावर नागपुरास येण्याचें कारण विचारलें काशीनाथानें नागपुरास येण्यास काय कारण झाले ह्याची सर्वथैव हकीगत ब्रह्मचारी यांना निवेदन केली. आणि महाराजाना सांगितलें कीं माझ्या पाठीमागें मंडळींनींही उगीच यातायात लावलेली आहे वास्तविक पहातां बापुजीलाच गादी मिळाली पाहिजे होती बरें. असो, झालेल्या गोष्टीस इलाज नाहीं. परंतु आतां गादी बापुजीस द्यावी आणि मला ह्या त्रासातून मुक्त करावे. हे आपण

ब्रह्मचारी महाराजांनीं ऐकतांच त्यांनीं विचार केला कीं हेच म्हंत गादीस योग्य आहेत. आपल्याला राजानें कशाकरितां बोलावले हें माझ्या ध्यानांत आले आणि त्याचा बंदोबस्त मी करतों असें म्हणून काशीनाथास घेऊन राजदरबारांतील मुख्य कारभारी देवाजी पंत चोरघडे यांचे घरीं आले. देवाजीपंत चोरघड्यांनीं सांगितलें कीं तुम्हीं ह्यांना राजदरबारीं घेऊन या. नंतर दुसरे दिवशीं अचलब्रह्म हे काशीनाथास घेऊन देवाजीपंत चोरघडे असतांना राजदरबारीं गेले. देवाजीपंतानें अचलब्रह्मांना पहातांच एकदम साष्टांग नमस्कार केला व आपण कोणीकडे आलांत असें विचारले. अचलब्रह्मांनीं घडलेला सर्व वृत्तांत देवाजीपंतानां निवेदन केला व देवाजीपंतानें तो राजास चांगल्या रितीनें समजावून दिला. बाजीराव साहेबास हे काशीनाथपंत आहेत असें समजतांच फारच आनंद झाला ते ह्मणाले आम्ही तुमच्या तिर्थरुपाचें दर्शन घेण्यास धापेवाड्यास आलो होतों परंतु आमच्या दुर्दैवानें त्यांचे दर्शन झाले नाहीं आतां आम्हांस आमच्या सुदैवानें तुमचे दर्शन घेण्याची संधी प्राप्त झाली आहे तर आपले तोंडून आम्हांला व आमच्या राजदरबारांतील सरदारांनां व कारकून वगैरे इतर मंडळींना स्तुत्य व बोधप्रद उपदेश मिळावा अशी आमची विनंती आहे.

काशीनाथबोवा म्हणाले राजा तुझी जर ऐकण्याची

इच्छाच आहे तर मी राजा व प्रजा यांचे पूर्वापार आलेले संबंध सांगतो तर याकडे निट लक्ष दे. प्रथमतः प्रजाही स्वतंत्र होती व प्रजेनें राजा नेमला असावा. राजाचें राजपण गेले; परंतु प्रजेचे प्रजापण कायमच आहे. तेव्हां प्रथम प्रजा असून त्यांनीं राहण्याकरितां घरें केली. त्या घराचे एक लहानसे गांव झाले. गांवास संरक्षण कोणी पाहिजे म्हणून आपल्यापैकीं कांहीं चांगलें शहाणे लोक निवडून त्याजकडे गांवाचा अधिकार सोंपविला. त्या निवडलेले लोकांनीं आपसात एक मुख्य केला. त्याचे मदतीस एक कारकून नेमला. त्याचप्रमाणें पृथकपृथक कामे नेमली तेच मुख्य तो पाटील, कारकून, तोच कुळकर्णी, पांड्या, मेहता, व दुसरे चौमुले, नाईकवाडी, रखवालदार असे हुद्यानें सर्व मिळून गांवचें काम न्याय इन्साफ वगैरे करीत असत. अशी पाच पन्नास गांवें मिळून एक परगणा झाला असावा. व तेथेंही असेंच लोक निवडून सर्व लहान गावांत अन्याय पक्षपात वगैर झाल्यास त्याचा न्याय तेथील लोकांनीं करावा.

त्यांत मुख्यतेच देशमुख, नाडगौड, वगैरे नांवें असावी. सर, कारकून तेच, देशपांडे देसाई वगैरे देश परत्वे निरनिराळी नांवें झाली आहेत. असे दहा वीस परगणे मिळून प्रांत त्या प्रांतात सदरप्रमाणें, सर, देशमुख, सरदेश पांडे वगैरे असत व दहा पांच प्रांत मिळून एक देशाची राजधानी. तोही राजा प्रजेनें

नेमला असावा हे स्पष्ट आहे. जसा गावास पाटील तसाच राजा देशास जसा गावाचा कुळकर्णी तसाच देशास प्रधान. जसे गावास रखवालदार तसाच देशास सेनापती मिळून एकसारखी रचना गावापासून देशापर्यंत प्रजेनेंच केली. परंतु त्या प्रजेचें कर्तव्य पुढें वंशज चुकल्यामुळें नेमलेले लोक तेच वंशपरंपरेचे मालकच झाले गावापासून तो देशापर्यंत, पाटलापासून तो राजापर्यंत एक मेला तर त्यांचा वंश मूर्ख असो किंवा वेडा असो, त्यास काम करण्याची अक्कल असो किंवा नसो, परंतु तोच मालक समजून काम करूं लागले मग अशा लोकापासून अन्याय होऊन प्रजेचें नुकसान झाले त्यापासून एकोपा बुडून वैमनस्य वाढलं जे जे सरदार बंदोबस्ताकरितां प्रांतावर व परगण्यावर राजानें नेमले तेच तेथील मालक झालेत. व ते मांडलीक बनले. त्यावरही वारसा त्यांचे वंशजाचाच. याप्रमाणें मालक सर्वच बनले व प्रजेचे स्वातंत्र्य, नष्ट झाले तसे न करतां पुर्वापार चालत असलेल्या रितीप्रमाणें वागले असतां राजाचें व प्रजेचे हित आहे. नुसते प्रजेनें जर स्वतंत्र म्हणून चालविले तर चालणार नाहीं. कारण, प्रजेच्यानें परस्परांचे संरक्षण किंवा न्याय होणार नाहीं. व कित्येक प्रकारें पक्षपात होऊं लागतील.

तसेंच देशाचें संरक्षणही प्रजेच्यानें होणार नाहीं व एकमेक एकमेकाचे आज्ञेत राहणार नाहीं. सर्वांचे ठायीं सारखी परोक्ष बुद्धी राहणें कठीण

यामुळें प्रजेवर राजा तर असणें अवश्य आहे परंतु त्याची रचना निराळी असावी. ती प्राचीन रितीनेंच असावी ती अशी कीं, लहान गांवातील लोकांनीं आपल्यापैकीं शहाणे, निःपक्षपाती लोक निवडून त्यांची लहान सभा करून त्या सभेनें गांवाचे लोकांचे हिताहितांचा विचार करावा. तसाच लहान गांवावर जो परगणा असेल तेथील लोकांनीं आपल्यातील चांगले लोक निवडून त्यांत गावोगावचे एक किंवा दोन मनुष्यें सभासद घ्यावें. म्हणजे गांवचीसुद्धां माहिती मिळवून एकंदर परगण्याचा विचार त्या सभेस सादर होतें. परगण्यावर जे प्रांत असतील त्यांनीं लोकांची निवड वरप्रमाणेंच करून त्यांत प्रत्येक परगण्यांतील एक दोन सभासद घ्यावे म्हणजे त्या सभेत परगण्याची व प्रांताची स्थिती समजून त्याचा विचार करण्यास हरकत रहात नाहीं. प्रांतावर जी राजधानी असेल तेथें निवडलेले लोकांचे सभेनें प्रांताप्रांतातील सभासद घेऊन सभा होईल त्या सभेत एकंदर राज्याचा विचार व्हावा. राजानें मनायोग्य कामदार असणें ते काम त्या सभेचे जोखमीवर आहे तर त्या सभेनें एक मनुष्य निःपक्षपाती शहाणा व कुळवान असा निवडून राजा नेमावा त्या राजानें कामाचे सोईकरितां चांगली माणसें सभेचे अनुमतानें निवडून ते ज्या ज्या कामाचे योग्य असतील तसे मंत्री नेमावे. त्या त्या कामदारानें आपल्या ताब्यांतील कामावर यथायोग्य मनुष्य नेमावा. प्रजेस

काय पाहिजे तिची आबादी कशी राहील व तिच्या सोई चांगल्या रहाव्या अशाविषयीं राजानें काळजी घ्यावी. आणि अशी कामें राजानें नेहमीं प्रजेचे सभेत ठेऊन वारंवार त्याचे अनुमत घेऊन त्याप्रमाणें काम चालवावे आतां सदरील व्यवस्था चालण्यास व प्रजेचे संरक्षण व्हावे व देशाचे संरक्षण होण्याकरितां व राजाचे व कामदाराचे खर्च चालण्यास द्रव्य पाहिजे ते यथान्याय रितीनें जमीनीवर वगैरे परिमीत करू ठेवणें तो सभेनें ठरवून राजास सांगावा व राजानें त्या प्रमाणें अमलांत आणावा व राजानें प्रजेचे पालन पुत्रवत करावें. व प्रजेनें परस्परांत एकोपा व प्रिती ठेवावी याप्रमाणें झालें असतां राज्य सुयंत्र चालून सर्वांचे ऐक्य रहातें. प्रजेनें आपआपले धर्माखेरीज इतर धर्माचा हेवा किंवा द्वेष करूं नये व राजानें तसे प्रजेस करूं देऊं नये, कदाचीत राजा गैरवर्तन करून अन्याय, जुलूम करू लागल्यास प्रजेनें सभेचे द्वारें दुसरा राजा नेमावा. राजाचा खर्च सभेनें परिमीत ठरवावा व उत्पन्नातून हमेशा शिलक राखावी समय विशेषीं ती शिलक उपयोगी पडते. प्रसंगवशात शिलकेपेक्षां जास्त खर्च राजानें सभेचे विचारानें करावा आणि तो सभेनें रयतेपासून वसूल घेण्यास राजास सांगावें याप्रमाणें पुर्वापर प्रजेचे व राजाचे धर्म चालत आले आहेत. याप्रमाणें करण्यास प्रजाजनहो तुम्ही फार दिवस चूक केली व तुमचे पूर्वजांनीं जे लोक नेमले

तेच मालक झाले. त्यांची बदलाबदल केली नाहीं, या मुळें लहान गांवापासून ते राजापर्यंत मालक ते झाले व तुम्ही दास समजून वर्तणूक करूं लागला. इतकेंच नाहीं तर राजा केवळ ईश्वर समजून त्यानें केले जुलम व अन्याय हे निमुटपणें सोसून स्वस्थ राहिला व आपसात एकी न ठेवितां तुम्हीही अन्यायानें वर्तू लागला एकमेकांत द्वेष करूं लागला. तेव्हां तुमची तुम्हांस भ्रांती पडली कीं आपला अधिकार कोणता राजाचा सबंध कसा ? याचा विचार कांहींच केला नाहीं. याप्रमाणें तुमची देश प्रीती व स्वदेशाभिमान नाहींसा झाला. या योगानें तुम्ही या स्थितीत प्राप्त झाले.

महाराजांचा हा स्तुत्य व बोधप्रद उपदेश ऐकून सर्वांना आनंद झाला. महाराजांची षोडशोपचारें बाजीराव साहेबानीं पुजा करून वस्त्रें अलंकार वगैरे दिले, आणि त्यांना जाण्यास निरोप दिला, तेथून काशीनाथ नागपुराहून निघून आपले गावीं आले. नागपुरास मिळालेले सर्व वस्त्रें अलंकार ब्राम्हणास वाटून दिले व आपण होते त्या स्थितींत राहिले. पुढें कांहीं दिवसानीं कोलबाजीची समाध पक्की बांधावी असा काशीनाथाचे आईनें विचार केला पुढें कारागीर वगैरे बोलावून कामास सुरुवात केली कामास लावते वेळीं काशीनाथानें सर्व मजुराना सांगितलें कीं तुम्हीं पाटी उघडून आंत पाहूं नका पाहिल्यास फार नकसान

होईल. कारागीरानें काशीनाथाचे म्हणण्यास मान न देतां पाटी उचलली पाटी उचलतांच आंतून विस्तवाच्या ज्वाला बाहेर निघूं लागल्या त्यासरसे कारागीर लोक बेशुद्ध होऊन पडले. हे वर्तमान काशीनाथास समजतांच काशीनाथ धाऊन आला व सर्वांना सावध करून कामास सुरुवात केली. पुढें सुरेख अष्टकोनी समाध बांधण्यांत आली. समाध बांधण्याबद्दल दानधर्म ब्राम्हण भोजन वगैरे करून समारंभ आटोपण्यांत आला.

---

# काशीनाथाचे चमत्कार.

एके समयीं असा चमत्कार झाला कीं, एक सावकार अतोनात श्रीमंत होता; त्यांची स्त्री रुपवान असून त्यांचे आज्ञेप्रमाणें वागणारी होती. त्यास चार पुत्र होते. तो उदार असून दया, क्षमा, शांति हे गुणही त्याच्या आंगी वसत होते. तो परस्त्रीस मातेसमान मानी. असे सद्‌गुण त्याच्या आंगी असतांही त्याच्या पुर्व कर्माच्या योगानें त्यास पंडुरोगाची व्यथा जडली. सर्वांगास कोडे पडले. जवळ जाण्यासही मनुष्यें त्रासली. म्हणून तो सावकारही कंटाळला शेवटीं त्यानें आपल्या स्त्री पुत्रादिकांस जवळ बोलावून सांगितलें कीं, आतां ही व्यथा माझ्याच्यानें सहन होत नाहीं. म्हणून तुम्ही

आता लवकर मला जलसमाधी द्या. मी चंद्रभागेंत प्राण देण्यास तयार आहे. मग मुलांनीं त्यास चंद्रभागेच्या कांठीं नेलें. तेथें त्याला चंद्रभागेंत अर्पण करण्याचें वेळीं चंद्रभागेच्या कांठीं अतिशय गर्दी जमली होती तेथें काशीनाथहा स्नान करण्यास गेला होता. त्याला चवकशी अंती समजलें कीं एक सावकार दारुण रोगानें पिडल्यामुळें प्राण त्याग करीत आहे. मग त्यानें गर्दीतून पुढें जाऊन सावकारास उपदेश केला व त्या कडून तो बेत रहित केला. पुढें त्या सावकारास आपले मठांत आणून त्याला कोलबाजीचे तीर्थ वगैरे दिलें त्याच्यानें त्याची दिव्य कांती झाली व रोग नाहींसा झाला. तेणेंकरून सर्वांस आनंद होऊन ते काशीनाथाचे पायावर मस्तक ठेऊन त्याचा जयजयकार करूं लागले.

मकरंदपुरीची पंढरीस जाण्याची फार इच्छा होती परंतु कोलबाजीनें पंढरीस त्याला जाऊं दिले नाहीं असे मागे आलेच आहे, आणि त्यांना उपदेश केला तो असा जेवढे ह्मणून तरुन गेले आहेत त्यांस तारक सज्जन कंठांतील उपदेशामृत झालें पांच वर्षांचे अल्लड लेंकरूं ह्याच अमृतानें अढळ पद पावले व वाल्या कोळी ह्या अमृतानें भूलोवर वाल्मिक झाले. वाल्मिकी, व्यास, शुक शौनकादिक, ऋषी, आणि सुत ह्यांनी ह्या भूमंडळावर ह्या अमृताचे अपार महासागर अठरा पुराणें, व्रत, कथा, महात्म्यें, इत्यादि नांवे देऊन तयार करून ठविले आहेत. भाग्यशाली पुरुष ह्या [illegible]

निमग्न होऊन अमोल मुक्ती मौक्तीक पावतात. श्रद्धा हीन अभागी त्यांच्यातील रस न समजतां आपल्या शिलाप्रमाणें कुतर्क व पाखांड वगैरे भयंकर जलचराच्या मुखीं पडून नाश पावतात. हे महासागर गिर्वान भाषेंत असल्याकारणानें व मनुष्याची आयुर मर्यादा अल्प असल्याकारणानें बहुतेक लोकांस दुर्लभ झाले. दयाळू परमेश्वरास त्यांची करुणा येऊन त्यांच्या उद्धाराकरितां प्रभूनीं मुकुंदराज, ज्ञानराज, नामदेव, तुकाराम, वामनपंडीत, मोरोपंत, नाथ, अमृतराय, कबीर, तुलसीदास, जैरामस्वामी, इत्यादि ज्ञान धनू उत्पन्न करून त्याजकडून भूमंडळावर ज्ञानामृताची वृष्टी करविली.

पंढरपुरचे महात्म धर्म नगरीसच आहेत हे एके दिवशीं पंढरीनाथानें उमाजी आबाच्या स्वप्नांत येऊन सांगितलें हे उमाजी आबा भोंसल्याचे दरबारांत कारभारी होते. त्यानां स्वप्न झाले ते असे धर्म नगरीचे पूर्वेस चंद्रभागेच्या कांठीं कांहीं दगड पडले आहेत. त्यांत दोन दगडाचा आकार मूर्तीसारखा आहे त्या दगडाची मूर्ती करून तूं घापेवाड्यास स्थापन कर, नंतर उमाजी आबा जागे झाल्यावर त्यांनीं ईश्वराची प्रार्थना करून विठ्ठल रुखमाईच्या मूर्ती स्थापन केल्या तेंव्हांपासून धापेवाड्याचे माहात्म पंढरपुरासारखेंच झाले आहे. पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर काशीनाथ यादोराव

त्यांनीं तेव्हांपासून विरक्त होऊन प्रपंच अगदीं सोडून दिला. भाद्रपद वद्य नवमी ह्या दिवशीं रात्रौ आम्ही वैकुंठास जाऊं असें सांगितलें. नेमलेल्या दिवशीं भजनाचे गजरांत ते विमानांत बसून वैकुंठास चालते झाले. त्यांची समाधी तेथेंच स्थापन केली व मोठा समारंभ करण्यांत आला.

---

# माधोरावास गादी मिळाली.

काशीनाथ वैकुंठास गेल्यावर पुढें गादी कोणाला द्यावी ह्मणून प्रश्न पडला. लोकांचे मनांत माधोरावास गादी द्यावी असें होतें. परंतु माधोरावचा वडील चुलतबंधु रघुनाथ ह्याला ते सहन झाले नाहीं; तो हातात शस्त्र घेऊन कोलबाजीचे समाधीसमोर याचा दृष्टांत व्हावा याची वाट पहात बसला, माधोराव हा प्रसंग पाहून रामक्षेत्री गेले, व ईश्वराचे चिंतन करीत बसले, पुढें साक्षात्कार होऊन माधोरावाला गादीवर बसविण्यांत आले. माधोरावाला गादीवर बसवितेवेळीं मोठाच उत्सव करविण्यांत आला माधोरावच्या अमलांत काशीनाथबोवाच्या समाधीला चिरेबंदी करविण्यांत आली. कारागीरानें समाध उकलून पाहिली तेव्हां काशीनाथ हें पूर्वींप्रमाणेंच बसले आहेत

असें दिसले माधोराव हेही फार ईश्वरभक्त होते त्यांना ७८ वर्षे झाल्यावर त्यांनीं आपल्या विठ्ठल नावाच्या मुलास बराचसा उपदेश केला. आणि आह्मीं आतां वैकुंठास चाललों असें कळविलें नंतर तीन दिवस पावेतो भजनाचा समारंभ चालला, महाशिवरात्रीचे दिवशीं सायंकाळीं माधोरावानें डोळे लाविले तो मंडपात एकच गडबड उडून गेली. गडबड उडालेली पाहून माधोरावानी मंडळीस सर्व समाधानीनें होऊं द्या मग आह्मी प्रयाण करूं असें ऐकताच सर्व मंडळी आपले जेवण खादण उरकवून माधोराव जवळ येऊन बसले. नंतर भजनाच्या व टाळाच्या गजरांत माधोरावास समाधी देण्यांत आली. माधोराव समाधीस्त झाल्यावर जेव्हां विठोबानें पुजा केली तेव्हां त्यांनीं एक डोळा उघडला होता. साधुचा महिमा काय वर्णन करावा. या युगांतील माणसाच्या पापाचा भार दुर्धर होतो ह्मणून त्यांच्या पाप क्षालनार्थ नारायणानीं साधुंची योजना केली आहे. पापी माणसानीं तिर्थांत स्नानें केली ह्मणजे त्यांचे कलिमलक्षालन होतात. साधुंचें स्नान तिर्थांत झालें ह्मणजे तिर्थांचें पाप क्षालन होऊन तीं पावन होतात. अन्य धर्माच्या लोकांचीही पुण्य क्षेत्रें भूमंडळावर पुष्कळ असून त्यांचा फायदा ते आपल्या शास्त्रास अनुसरून घेत आहेत.

# विठोबा महाराज.

माधोराव मेल्यानंतर मंडळीनें विठोबास गादीवर बसण्याविषयीं विनंती केली, परंतु विठोबानें ते मंडळीचे ह्मणणें नाकारून सांगितलें कीं आमचे येथें साक्षातकार होण्याची चाल आहे. साक्षातकार झाल्याशिवाय मी गादीवर बसणार नाहीं. पुढें श्रावण महिन्यांत चमत्कार झाला तो असा कृष्णपक्षाचे एकादशीस रात्रीचे वेळीं विठोबा महाराज कीर्तन करीत असतां सर्वांसमक्ष माधोराव हें कीर्तन ऐकावयास येऊन बसले. सर्व मंडळी माधोरावकडे पहात होती. परंतु मेल्यानंतर हे पुन्हां कसे आले याचा विचार कोणीच केला नाहीं सर्व कीर्तन ऐकिल्यावर माधोरावानें केशवभट पुरोहितास आपले जवळ बोलावून सांगितलें कीं मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीचे मुहुर्तावर विठोबास गादीचा अभिषेक करा. असें ह्मणून ते उठून जाऊन गाडीत बसले, मंडळी त्यांना गाडीपर्यंत पोहचविण्यास गेली. माधोराव निघून गेल्यावर सर्व मंडळी शुद्धीत आली व माधोराव कसे आले या गोष्टीचा उलगडा करूं लागले. महाराजाच्या आज्ञेप्रमाणें विठोबास गादीवर बसविले. माधोरावाच्या ह्मणण्यांत दैवीक सामर्थ्य आहे असें मंडळी समजली. शब्द ह्मणजे अक्षर समुदाय शब्द ब्रह्माचा अवयव ह्मणूनच कीं काय, अक्षर ( नाश न पावणारे )

अशी संज्ञा अक्षरास दिली आहे. अमंत्रो अक्षरं नास्ति. हें वाक्य प्रसिद्धच आहे. शब्दामध्यें दैवीक सामर्थ्य आहे हें मंत्र शास्त्रावरून स्पष्ट होतच आहे या शास्त्रावर सध्यां बरीच अश्रद्धा झाली आहे. आणि ती होण्यास लबाड भोंदू लोकच कारण झाले आहेत, पण शब्दामध्यें मंत्र सामर्थ्य आहे याविषयीं प्राचीन प्रमाणेंही पुष्कळ आहेत. दैत्य गुरूचा अमृतसंजीवनी मंत्र पुराण प्रसिद्धच आहे ब्राह्मणाचा गायत्रीमंत्र जहागीर आहे. “ मंत्राधीनंच दैवतं ” असें पुरातन वाक्यही सर्वश्रुत आहे. सर्वांच्या मंत्राविषयीं पुष्कळ दंतकथा आहेच तस्मात् शब्द ब्रह्म आहे हे निर्विवाद आहे.

विठ्ठलरावचें पत्नीचे नांव कृष्णाबाई असे होते. ही पतीच दैवत आहे असें मानत होती. पतीला पत्नीनें दैवतकांत मानावें बरें ? आपली प्रत्यक्ष दैवतें माता-पितरें आपल्या जीवासजीव देणारी व आपल्यावर प्राणाप्रमाणें ममता करणाऱ्या सहोदरी तशींच कुटूं-बातील आणखी प्रेम करणारी माणसें ह्याच्यापेक्षां कोठली परघराण्यांतील मुलगी पण तिला जो जवळ मानितो आपल्या सर्व आयुष्याची व सुख दुःखाची सत्ता स्वाधीन करतो जिच्या पालन पोषणाकरितां अनुदीन घाण्याच्या बैलाप्रमाणें संसार घाणा फिरवितो. लाड आणि कोड पुरविण्याकरितां द्रव्य संपादन करण्यासाठीं मान अपमानाचा फारसा विचार करीत

नाहीं जिला केवळ प्राण समजतो. सर्व संसार यात्रा हिच्या बरोबर करितो संसारातील मेहनतीची, श्रम साहसाचीं, प्राण धोक्यांत घालण्याची, हाल अपेष्टांचीं कामें स्वतः करून त्यापासून मिळणाऱ्या धन दौलतीचा खरा उपभोग हिला देतो सदासर्वदा घरात राहून मौजास हीनें भोगावी. अलंकार भूषणें हीनें ल्यावी. सुगंधीक द्रव्यें हीनें आपले अंगास लावावी फुलांचे गजरे हीनें घालावे हिचा थाटमाट आणि सौंदर्य पाहून त्यानें स्वर्गसुख मानावें ह्यानें मिळविलेल्या द्रव्यावर हीनें दानधर्म करावा लौकीक मिळवावा, ह्यानें जरी कोणी पुण्य कृत्य केलें तरी त्याचा निम्मे वाटा तिला देणें हा मोठा संतोषानें पत करितो, हिच्या दुष्कर्माबद्दल संसार चक्राबद्दल दंड ह्यांनीं सोसावें, असें लिहावें तितके थोडेंच तात्पर्य नवरा हा स्त्रीचा देवच अशा भावनेनेंच तिनें त्याची सेवा केली पाहिजे. आणि केली असतां तिला ती फलद्रूप होतें. तिन्ही देव तान्ही बाळें करून अनुसयेनें पार्वती, लक्ष्मी, आणि सावित्री यांची छान कोणत्या बळावर उतरली ! आपला भर्ता यमाच्या हातून सावित्रीनें कोणच्या सामर्थ्यानें परत आणिला !

विठ्ठलरावास ग्यानदेव, नामदेव, गंगाराम, अशीं तीन मुलें होती. नामदेवास, साखरू ( नामदेव बोरघरे नागपुरकर ह्यांची मुलगी ) तुळजाबाई ( बापु पाटील अर्जुनकर यांची मुलगी ) अशा दोन स्त्रिया होत्या.

गंगारामास, सखुबाई ( महादेव दलाल उमरेडकर यांची मुलगी ) व पुर्णाबाई ( रामाजी हुंबरी नागपुरकर यांची मुलगी ) अशा दोन स्त्रिया होत्या. साखरूबाईस, यादोराव, मिरा, रुक्मिणी, व राधाबाई अशीं चार अपत्यें होती. विठोबा महाराजाचे अमलांत जे चमत्कार झालेत त्यांच्यापैकीं पुढें दिले आहेत.

गावांत पटकीचा बिमारी सुरू असतां ग्यानदेव एकाएकीं बिमार होऊन मरावयास टेकला, मंडळीनीं ह्याला वाचवा अशी महाराजाना प्रार्थना केली. ते ह्मणाले ईश्वर ईच्छेपुढें कांहीं चालत नाहीं तरी परमेश्वरास दया येत असल्यास पहातो; असें बोलून उपाद्धेरावजी ह्यानां कोलबाचे चरित्र वाचावयास सांगितलें पोथीचे सात पारायण होतांच महाराजानें ग्यानदेवास एकदम हाक मारली, त्यासरसा त्यानें ताडकन उठून महाराजाचे चरणीं लोटांगण घातले परमेश्वर कृपेनें त्याचें मरण चुकलें. पुढें तो कांहीं दिवसांनीं मरण पावला, त्याच्या मृत्युनें लोकांत फार कहर उडून गेला. आज राजाच उचलून नेऊन सगळा देश शोक सागरांत लोटला ! आज काय आंधळ्याची काठीच घेऊन गेला ! सगळा स्वयंपाक मोठ्या मेहनतीनें संपादन करून ताट वाढावें, आणि तोंडात घास घालणार, तो दुष्टानें ताट उचलून न्यावें, भर तारूण्यांत येऊन वल्लभाच्या भेटीविषयीं कुलवधु अतूर झाली असून एक एक दिवस युगाप्रमाणें काढीत असतां

वल्लभास काळानें ओढून नेल्याची वज्रपात तुल्य बातमी येऊन धडकत आहे ! शेंकडों मुलें पोरकी होत आहेत, ह्यातीरी मातापितरें विव्हळ होत आहेत, अबला निराश्रीत होत आहेत, असा प्रकार होत असतां, असल्या मृत्यु लोकांतील आपण वेडी माणसें दोन दिवसांच्या बाजाराकरितां लोकांच्या मुंड्या माना मुरगाळीत आहों ! नानाप्रकारचें लोकांस लुबाडीत आहों ! सर्पाच्या तोंडातील बेंडूक, मासा, गिळीत असतो. तसा हा प्रकार नव्हे काय ? ह्या एकाच गोष्टीवरून संसार हा केवळ दुःखांगारा अग्नीनें भणाणलेली खाई आहे. अहिमुखगत भेकसुख समृद्ध मानतां, तर आता संसार सम्यकसार म्हणतां येईल. नाभीगत कस्तुरीच्या वासाच्या शोधाकरितां रानावनांत भ्रमण करतां करतां मृग मरून जातो, तरी त्यास ती प्राप्त होत नाहीं; त्याप्रमाणेंच आनंदास्तव लक्ष चौऱ्यायशीं योनीचे फेरे घेऊन घेऊन अनंत जन्मीं मन शिणतें; पण त्यास निजानद प्राप्त होत नाहीं.

महाराजाबरोबर पुष्कळ भक्त मंडळी रहात असे. त्यांत तलमल्या कोष्टी या नांवाचा एक शिष्य होता. तो महारोगानें अगदीं पिडून गेला होता, त्याचा सर्व लोक तिरस्कार करीत, लोक त्यास न येऊं देण्याविषयीं महाराजाला विनंती करीत, परंतु महाराज त्यांचेकडे लक्ष न देऊन घरातील सर्व कामधंदा त्याचेकडूनच करवीत होते. पुढें त्याचा रोग कांहीं

दिवसांनीं अजीबात नाहींसा झाला.

पुढें असा चमत्कार झाला कीं, एके दिवशीं विठोबा महाराज लोधीखेड्यास गेले, येथें एक ब्राह्मण रहात होता, तो आपल्या बायकोशीं नित्य कांहीं तरी कुरापत काढून भांडण करी, आणि जर तिनें कांहीं उत्तर दिलें तर मी विठोबा सारखा संत होईन, मग तुझा संसार सपला ! नाहींतर माझे मस्तक दुखऊं नको, अशी तिला तो धमकी देई, तेणेंकरून ती बिचारी साध्वी उगीच राही, तिला वाटे कीं माता पिता ही जशी पुत्राची दैवतें आहेत त्याप्रमाणें पतीही कांतेचे दैवत होय असे आपल्या शास्त्राधारानीं ठरविलें आहे, आपल्या शास्त्राची ही एक खुबी ध्यानांत ठेवली पाहिजे कीं त्यांनीं ज्या मर्यादा आणि जी कर्तव्यें ठरविली आहेत तीं केवळ कर्तव्याच्या तत्वावर ठेवली आहेत, ह्यामुळेंच आपल्या मध्यें भक्ति आणि प्रेम असतो. मोबदल्याच्या तत्वावर संबंध असला म्हणजे केवळ बाजारी बनतो त्यात प्रेम किंवा भक्ति ह्याचा वास होण्याजोगा नसतो पत्नीनें नवऱ्याची सेवा करण्याची ती आपल्या कल्याणाकरितां, भक्ति करावयाची आपल्यास पतीकडून मोबदला भरपूर मिळेल तर आपण तितक्यापुरतें प्रेम दाखऊं, मोबदल्याच्या तत्वाच्या ठिकाणावर असतें या भितीनें ती कांहींच उत्तर न देतां निमुटपणें

ऐकून घेई. भौरुपी शस्त्रें झाटतात, तरी त्याचें शूरत्व किती. गरभीण नसतां डोहळे सांगणें, पर्जन्यावांचून मेघ गर्जना, हिजड्यांनीं स्त्री पणाचा हाव घालणें, ढोरक्यानीं राजा होणें, ह्यापासून कितीसा उपयोग व्हावयाचा, तसेंच चित्तास शांती विरक्ति नसतां नुसत्या वैराग्याच्या गोष्टी सांगणें याचा परिणाम स्वार्थ ना परमार्थ हाच होय, त्याचप्रमाणें त्या ब्राम्हणाचे वैराग्य खरा अनुताप झाल्यावांचून कोठपर्यंत टिकाव धरील तरी त्याची स्त्री त्याचा छळ सहन करून उगीच राही. एके दिवशीं त्याची स्त्री विठोबाकडे जावून तिनें आपली सर्व हकीगत त्याला सांगितली आणि कांहींतरी युक्ति काढून याचा बंदोबस्त व्हावा, म्हणून प्रार्थना केली मग त्यानें तिला समजून सांगितलें कीं यापुढें जर तुझा पती तुझ्याशी भांडून बैरागी होऊन साधू होऊन विठोबाकडे जातो असें म्हणाला कीं " चालते व्हा बैरागी होऊन " असें सांगून मजकडे येऊं दे. मग मी असा मंत्रोपदेश देईल कीं जसे दरवेशी लोक माकडाला नाचवितात तद्वत् तो तुझ्या स्वाधीन होईल. मग ते त्याचे बोलणें तिनें मान्य करून त्यास नमस्कार करून ती घरांत गेली. तिचा नवरा बाहेरून घरीं येतांच तिजवर अमल बजावूं लागला. अजून स्वयंपाक झाला नाहीं. उशीर झाला मला भूक लागली वगैरे बोलूं लागला आणि संतापल्या सारखा होऊन बोलला कीं मी आतां होतोच विठोबा

सारखा बैरागी मग मार मजा तुला हवी तशी. असा धाक घालु लागला मग ती ह्मणाली तर मग आता कशाला उशीर करीतां. व्हा विठोबा सारिखे आणि जा त्याजपाशीं व्हा त्याचे शिष्य आणि मारा खाण्या-पिण्याची मोफतची मज्या असें तिनें सांगितल्यावर तो चिंतेत पडला. मग तो धोतरें तांब्याबरोबर घेऊन विठोबाकडे गेला आणि त्यास म्हणाला मी तुमच्या सारखा संसार टाकून गोसावी होतो मला उपदेश करून तुमच्या संगतीनें परमार्थाकडे लावा हें ऐकून विठोबानें म्हटलें कीं तुझ्यासारखा विरक्त बैरागी पाहूं गेल्यास मिळावयाचा नाहीं. आतां ती धोतरें पागोटें ही सारी मजजवळ दे आणि हातांत भोंपळा घेऊन मला पाणी आणून दे. तो भुकेनें अगदीं व्याकूळ झाला होता तरी असें म्हणून नदीवर पाणी आणावयाकरितां गेला.

इकडे मागें विठोबानें त्याच्या पागोट्याच्या चिंध्या करून झुगारून दिल्या आणि तांब्या डोहांत फेकून दिला, इतक्यांत तो पाणी घेऊन आला मग विठोबा त्यास म्हणाला आतां कंबरेस दोरा बांधून लंगोटी लावा मग त्यानें ते कबूल केल्यासारखें दाखवून धोतर सोडून आणि लंगोटी नेसून त्यास म्हटलें कीं मला आतां अति भूक लागली आहे, कंठीप्राण येऊन राहिला आहे मग विठोबानें पतीत फळे दातानें तोडून खात बसला आणि त्यानें त्यालाही तेंच

खावयास दिलें, मग ब्राम्हण ह्मणाला ही फार कडू आहेत माझ्यानें खाववत नाहीं. तेव्हां विठोबा म्हणाला आतां जिव्हेला चव कशाला पाहिजे तूं सर्व संग परित्याग करून मजकडे आलास बरें आहे तुला कांहीं थंड पदार्थ देतो तो खा, हें ऐकून त्यास हर्ष झाला; मग विठोबा कडूनिंबाचा पाला खात बसला, त्यालाही थोडासा दिला, हे पाहून ब्राम्हण मनांत ह्मणाला माझें नशीब धड दिसत नाहीं ! ओल्या कोरड्या भाकरी खाऊन घरीं सुखाचा होता तो कोठून अवदसा आठविली कोण जाणे आतां कसे करावे ? थंडीनें हुडहुडी भरून आली भुकेनें जीव चालला असे त्याच्या मनांत नानातरंग येत असतां विठोबानें ते जाणून त्यास विचारिलें कीं सुखाचा संसार सोडून या विपत्तींत पडावयास कशाला आलास. त्यानें उत्तर दिलें फुटक्या नशीबाचा मी. स्त्रियेशीं व्यर्थ भांडण करून या संकटांत येऊन पडलों. तुमची संगत फार कठीण. चिरगुटसुद्धां धड नाहीं आतां अशा वेशानें घरीं कसा जावूं. दिवसास जावें तर लाज वाटते. रात्रीं गेलो तर बायको मला लंगोट्याला घरीं येऊं देणार नाहीं. मग विठोबा त्यास म्हणाला तूं नित्य स्त्रीला छळून मी विठोबा सारखा होईल म्हणून म्हणत आलास तरी आतां यापुढें तिशीं कोणत्याही कारणानें भांडण करणार नाहींस, व तिला धमकी देणार नाहींस असे शपथ वाहून कबूल करित असला-

स नर मी तुझा तिचा एकोपा करून तुला कोणाला न समजूं देतां घरीं नेऊन पोंहचवितो मग तो म्हणाला मी जर भांडण करीन तर देवाची शपथ वाहून सांगतों कीं माझी जिव्हां झडून जाईल, असें बोलून त्याचे पाय धरले, मग विठोबानें जावून त्याच्या बायकोस सर्व वर्तमान सांगून म्हटलें कीं तूं तरी त्याच्याशी भांडू नकोस तो येतांच त्याला धोतर नेसावयाला दे वगैरे सर्व सांगुन परत आला व त्याला घरी जावयाला सांगितलें तिनेंही विठोबाचे म्हणणें आनंदानें कबूल केलें मग रात्रीं आंधार पडल्यावर कोणी न पहावें म्हणून तिचा नवरा भितभीत गावांत येऊन हळूंच घरांत शिरला ही गोष्ट कोणास बाहेर कळूं दिली नाहीं. त्या दिवसापासून तीं उभयतां आनंदानें वागूं लागली.

घनःश्याम माताधरे ह्यांचे महाराजावर अतिशय कर्ज होतें. म्हणुन त्यानें कर्जाकरितां राजदरबारीं फिर्याद केली महाराजास कचेरीत जाणें मुळींच ठाऊक नव्हतें म्हणून यानां फार अडचण पडली. महाराजांचा इजार धापेवाड्यास ऐकण्याचें ठरलें त्याप्रमाणें न्यायाधीश मि० रामचंद्रराव धापेवाड्यास आले आणि महाराजाचें म्हणणें लिहून घेतले. महाराज सत्यवचनीं होतें. पुर्वींचे मनुष्य सत्यवचनीं होतें. याचा दृष्टांत रामचंद्रराव हे सांगतात कीं स्वराज्य हानी झाल्यावर ही आपल्यावर जोपर्यंत पुराणादीक नितीग्रंथाचा

अमल होता, धर्म व कर्म गुरू व यांच्या विषयींची पूज्य बुद्धी कायम होती, वडील मानसे व शिष्ट सभावीत माणसें यांची मर्यादा सुटली नव्हती. तोपर्यंत साधारणतः समाजातील पुष्कळ लोक सत्य भाषणी होते. खोटे बोलण्यास अडाणी कुनबी वगैरे भीत असत, मग शपथेस थरथरा कांपत यात नवल नाहीं साधारण तंटे इमान प्रमाण करण्यावर तुटत असत. गीता, गंगाजळी, गाईचे शेंपट यांचे शपथेवर न्यायाचे काम भागत होते, त्या वेळेच्या सत्य निष्टे-विषयीं सामान्य लोकांतील एक दोन घडलेली उदाहरण सांगतो. आमचे वडिलाचे वेळीं नानाजोशी म्हणून एक कारकून होते, त्याजवर एका कुनब्यास सारा वसूल करण्याकरितां मारल्याबद्दल फिर्याद झाली, मारल्याचे नाकबूल केले तर शिक्षा होत नाहीं असें कळलें असून त्या सत्य वक्ताचे सत्यच्यूर होण्यापेक्षां एक महिन्याची कैद पत्करली. श्रीभास्कर मोरेश्वरदेव उरळीकर यांच्या मुलांच्या आणि पुतन्याच्या वादांत मुलाचे म्हणणे खोटे ठरले तर मुलगा खोट्या प्रतीज्ञेंत जाणार, व वाद बुडणार असा प्रसंग असतां मुलाचे ह्मणणे खोटे होते ते खोटेच म्हणून सांगण्यात हे सत्यनिष्ट कचले नाहीं.

महाराजानीं त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व कर्ज कबूल केलें त्याप्रमाणें कोर्ट रामचंद्ररावानी सत्य भाषणानीं डिग्री केली. त्याबरोबर कोर्टांत एका गृहस्थानें मुद्दल

सर्व रुपये महाराजाचे नावानें पटवून दिले व तो मनुष्य कोण असावा यांचा पत्ता लागला नाहीं.

मुद्दल रुपये दिल्यानंतर व्याजापैकीं कांहीं रुपये राहिले होते तेही महाराज लवकरच देणार होते; परंतु सावकार मांताघऱ्यास धीर न राहून तो पुन्हां फिर्याद करण्याची तयारी करूं लागला. तो पहाटे आपले सुनेस पाणी स्नान करण्यास मागूं लागला इतक्यांत त्याची सून चुलीजवळ जाऊन पोंहचताच तिच्या लुगड्याला अग्नी लागून पदर पेटला. व तेणेंकरून ती भाजून परलोकवासी झाली.

इतकेंच नव्हे तर तिच्या लुगड्यानें पेट घेतांच त्या ज्वाळा दुसऱ्या कपड्याला लागून सर्व घर पेटलें व त्यांतील सर्व मालमत्ता वगैरे पार जळाली. लिहाव-याचें तात्पर्य हेंच आहे कीं त्याची सर्व इस्टेट जळून खाक झाली. व तो अन्नान्न करीत दारोदार फिरूं लागला. अशा छळ करणारास शिक्षा अयोग्य झाली असें कोण म्हणेल ? तर मित्रहो साधुसंताची छळना करूं नका

सिताराम खोरघे ह्याना महाराजाच्या कृपेनें मुलगा झाला ही गोष्ट मागें सांगितलीच आहे तोच मुलगा एके दिवशीं फार बिमार झाला. हा मुलगा फार अशक्त होता व निद्राप्रिय होता दिवसरात्र निद्रा व अशी त्यापासून फारच मरणोन्मुक्त झाला याकरितां म्हणून महाराजांनीं निद्रा नियमित घ्यावी निद्रा पासून

शरीराचें काय वाईट परिणाम होतात ह्याबद्दल थोडक्यात दिग्दर्शन करीतों.

ह्याच देशांत अनेक नवनाग सहस्र बळी होऊन गेले, एका दिवसात पुण्याहून पंढरपुरांत खांद्यावर जबरदस्त कढईचे ओझे घेऊन जाणारा दंडवते उपनांवाचा ब्राह्मण पंढरपुरास तीस चाळीस वर्षांच्या मागें हा पाहिलेला आहे, उत्तरवयास सुद्धां तो अनेक अनाथ प्रेतें बगलेंत मारून नेत असे, पुष्कळ लोक माझ्या ऐकण्यांत आहे. चंद्रपूर जिल्ह्यांत केंमभट नावाचा ब्राम्हण असे, तो दररोज सकाळीं स्नान संध्या वगैरे करून वनींवरून १४ कोस चंद्रपूर नावाचे गांव आहे तिथें भिक्षा मागण्यास जात असे व भिक्षा मागून लगेच संध्याकाळीं वनीला परत येत असे हे तर झालेंच पण सौभाग्यवती त्याची भगिनी तिची तर गोष्ट अगदींच विलक्षण आहे ती मी वाचकाचे समोर मांडतो, म्हणजे ती ऐकून केवळ वलत्याच्या वांग्याप्रमाणें पोकळेल्या आताच्या प्रजानां आम्ही नीसार आहों असें वाटल्यावांचून कधीं रहाणार नाहीं. केंमभटजी हे फराळ करण्याकरितां चार पायल्या सातुचे पीठ दगडीत घेऊन बमून प्रिय भगिनीस ताजे तेल वहाड म्हणुन आज्ञा करात असे म्हणजे तिनें दोन दोन पायल्या जवस हातानें रगडून तेल काढून त्याना द्यावे असे अनेक प्रकारच्या गोष्टी त्यांच्या सामर्थ्याचे प्रसिद्ध आहे त्यात एक नमुन्याकरितां

दुसरी गोष्ट प्रिय वाचकासमोर मांडतो केंभटजी अनेक विलक्षण सामर्थ्यशाली आहे अशी कीर्ति चहुकडे पसरली, हे नागपुरच्या प्रसिद्ध दोन पहेलवानानी ऐकिले व त्याचे मनांत असें आले कीं ब्राम्हण असून एवढा जोरदार आहे तेंव्हां एकवेळ पाहीला पाहिजे असें मनांत आणून ते दोघेही वनी मुक्कामीं केंभटजी-च्या भेटीस आले तेंव्हां केंभटजी गंगेवर स्नान करून आपले वस्त्र वाळवीत होते इतक्यांत हे जाऊन पोंह-चले. केंभटजीनीं यास प्रश्न केला कीं तुम्ही कोण आहा म्हणून त्यांनीं सांगितलें व आम्ही नागपुरचे प्रसिद्ध पहेलवान आहों व केंभटजीच्या भेटीसाठीं आलो हें ऐकून केंभटजी म्हणाले मी केंभटजीचा शिष्य आहो तुम्हांस केंभटजीची भेट करून देतो, परंतु या झाडाच्या फांदीला केंभटजीनीं आपले धोतर वाळु घातले आहे ही फांदी तुम्ही व आम्ही मिळून वाकवू म्हणजे धोतर मी काढतो असें म्हणून ज्या फांदीस धोतर वाळु घातले होते ती फांदी केंभटजीनीं वाक-विली व या दोघा पहेलवानास सांगितलें कीं तुम्ही दोघेही फांदी जोरानें धरा म्हणजे मी धोतर काढतो हे ऐकून फांदीला दोघानें जोरानें धरली नंतर केंभट-जीनीं ती फांदी सोडली पुढे ते दोघेही पहेलवान त्या फांदीस लटकले जसे झाडास फळे लोंबकाळते त्या प्रमाणें हे दोघे पहेलवान लटकले व मोठ्यानें ओरडा-वयास लागले केंभटजीनीं त्यास सांगितलें कीं मीच

कंभटजी आहों पुढें दोघे पहेलवान म्हणाले महाराज चुकलों आमचा पहेलवानी पनाचा गर्व नाहींसा झाला आतां आम्हांस जीवदान द्यावे अशी त्यांची विनवनी ऐकून कंभटजीनें आपल्या प्रिय भगिनीस सांगितलें ती फांदी वाकवून त्यांना सोडीव नंतर बधुची आज्ञा मान्य करीव तिनें ती फांदी वाकवून धरली व त्यास मुक्त केले अशा त्यांच्या चमत्कारिक गोष्टी अनेक आहे.

---

## प्रेत उठविलें.

उमरेडास कोलबाचा 'शिवबा' नांवाचा एक शिष्य होता असें मागें सांगितलें आहें. एकेदिवशीं गणोबा लोखंड्या ह्या नांवाच्या एका उमरेडच्या ब्राह्मणास दोषिक ज्वर आला. पुढें त्याची प्रकृति फारच बिघडली ह्मणून मुद्दाम शिवबाची परिक्षा पहावी ह्या हेतूनें ब्राम्हणांनीं गणोबास कोलबाचे मठांत आणून टाकले व ते शिवबास म्हणाले " महाराज आपल्या गुरूची व आपली मोठी किर्ती आहे तर आतां ह्या गरीब ब्राह्मणास वाचवावें.

शिवबा—" जसा भाव तसा देव. तुमच्या मनांत भावच असेल तर तुम्हाला देव पावेल. परंतु ह्याला येथें

आणण्याची काय गरज होती. घरींच ठेवून देवाचें भजन केल्यास चाललें नसतें काय ?

ब्राह्मण—" ते कांहींही असो. ह्यास आपले देवासमोर निजविलें आहे. पुढें ह्याचें काय वाटेल ते करा." असें म्हणून सर्व ब्राम्हण निघून गेले. आठ दहा दिवसांनीं तो ब्राम्हण मरण पावला. त्याचे कुटुंबांतील सर्व माणसें मठांत येऊन शोक करूं लागलीं. ब्राम्हण शिवबाची निर्भत्सना करूं लागले. शुद्राचे येथें मरण पावल्यामुळें त्याचें प्रेत उचलण्यास कोणी ब्राम्हण येईनात. शिवरामास मोठा विचार पडला. त्यानें आपल्या सर्व शिष्यांस बोलावूं पाठविलें व त्यास म्हणालें: " आमचे ब्रीद जात आहे. आम्ही आपले घरादारास आतां पाणी सोडलें आहे. ह्या ब्राम्हणास जिवंत केलें पाहिजे. ज्यांना ब्रीदाची काळजी असेल त्यांनीं आमचे बरोबर भजन करूं लागावें. ज्यांना घरादाराची आशा असेल त्यांनीं खुशाल घरीं जावें. " असें निर्वाणीचें भाषण ऐकून कोण बरें घरीं जाणार आहे ? सर्व मंडळी शिवबाजवळ जमली व कापूर उजळून त्यांनीं भजनास आरंभ केला ब्राह्मणाचे प्रेत देवासमोर ठेविलें व ते मोठमोठ्यानें कोलबाचा धांवा करूं लागले. भक्ताची प्रार्थना ऐकून कोलबास दया आली व शिवबाचे हृदयांत प्रगट होऊन त्यांनीं सांगितलें कीं प्रेताचे मुखांत तीर्थ घाला. व लोहगांवीं तुकारामानें एका ब्राम्हणाचें प्रेत उठवितेवेळीं म्हटलेला संजीवनीचा अभंग म्हणा

म्हणजे प्रेत उठेल. त्याप्रमाणें शिवबानें ब्राम्हणाच्या प्रेताचे तोंडांत तीर्थ घातलें व संजीवनीचा अभंग गाइला. तो अभंग असा.

करुणा कल्होळनी ॥ अमृत संजीवनी ॥
येई माय बहिणी ॥ विठाबाई ॥ १ ॥
जगाच्या जीवना ॥ माझ्या जीवप्राणा ॥
धांव नारायणा ॥ लगबगीं ॥ २ ॥
अमृत अमर ॥ म्हणती सुरवर ॥
तयाचा उद्धार ॥ केला नामें ॥ ३ ॥
तें हें नामामृत ॥ पाजिलें जीवासी ॥
तारक शिवासी ॥ झालें नाम ॥ ४ ॥
रामकृष्ण हरी ॥ रसना उच्चारी ॥
पावला कैवारी ॥ तुका म्हणे ॥ ५ ॥

अभंग म्हटल्याबरोबर गणोबाचे प्रेत एकदम उठून उभे झाले तो जिवंत झाल्यामुळें सर्वांस मोठा आनंद झाला. ज्या ब्राम्हणांनीं शिवबाची निर्भत्सना केली होती ते आतां स्तुती करूं लागले. व शिवबाची किर्ती जिकडे तिकडे पसरली.

कोणे एके दिवशीं बोरघरे या घराण्यांतील ता मुलगा अतिशय बिमार होऊन मरण्यास टेकला तेव्हां सिताराम बोरघरे हा नागपुरावरून निघून धापेवाड्यास आला आणि महाराजास माझा मुलगा वाचवा असें म्हणूं लागला महाराजानां त्याची दया येऊन त्याला सांगितलें कीं तूं नागपुरास जाऊन

गीतेचें पारायण व होम करीव. नंतर तो महाराजांची आज्ञा घेऊन नागपुरास आला आणि होमाला सुरुवात केली. महाराज कांहीं कारणानें धापेवाड्यावरून निघून नागपुरास आले आणि तो थाट अवलोकन केला. महाराजांच्या मनाला तो होम रूचला नाहीं ह्मणून महाराजांनीं ब्राम्हणाकडून दुसरा होम करविला त्यानें मुलाची प्रकृती लागलीच सुधरली ह्या मुलावर त्याचे आईबाप फार प्रेम करीत असे पातण्या ज्या प्रमाणें नेत्राचे रक्षण सदा सर्वकाळ करतां त्याप्रमाणें मुलाची संरक्षण मातापितरें करीत असतात पाऊस पाणी ऊन तहान इत्यादि आपण सहन करून छत्र ज्याप्रमाणें आश्रीतांचे संरक्षण करते. त्याप्रमाणें मातापितरें सर्व संकटें कर्ज, वाम हाल अपेष्टा आपण सोसून मुलाचे संरक्षण करितात. त्यास विद्यामृत पाजितात. त्याचा भाग्योदय होण्याकरितां जे जे म्हणन करावें लागते ते ते मोठ्या कळकळीनें व उत्कंठेनें करितात म्हणूनच माय बापाची योग्यता शास्त्रानें देवाहीपेक्षां जास्त मानली आहे कार्यारंभी आधी मातृ देवोभव म्हणून नमस्कार करावा लागतो त्यांतल्या त्यांत बापाची ममता थोडी तरी लोभांच्या म्हणजे मोबदल्याच्या इच्छेनें असते पण मातोश्रीची केवळ कळवळ्यानेंच असते. संन्यास घेतल्यावर देवाच्यासुद्धां ऋणातून मुक्त पाणी होऊन नारायणरूप होतो त्याला देवासही नमस्कार लागत नाहीं पण

मातोश्रीला नमस्कार करावा लागतो. फक्त संन्यास घेणारा मात्र मातृ ऋणांतून मुक्त होतो बाकीच्या एका घडीच्या स्तन पानाच्या ऋणातून हीं मुक्त होता येत नाहीं. माय बापाची योग्यता तुकाराम महाराजांनीं केवढी मानलेली आहे पहा.

॥ माय बाप केवळ काशी ॥
॥ तेणें न जावे तिर्थाशीं ॥

विठोबा हे कांहीं दिवसपर्यंत बोरवऱ्याचेच घरीं होते त्यानीं एके दिवशीं आपले मंडळीस ह्मटलें आमचे मरण आतां जवळ आले आहे तर आम्हांस धापेवाड्यास घेऊन चला व समाधीची सर्व सामान बरोबर घ्या मंडळीनें समाधीचे सर्व सामान व विठोबास घेऊन धापेवाड्यास आले ह्यांचे बरोबर इतर गांवची ही पुष्कळ मंडळी आली. विठोबा मार्गशीर्ष वद्य १४ सन १३०३ ह्या दिवशीं समाधीस्त झाले.

पूर्वापार चालत आलेल्या रितीप्रमाणें विठोबाची समाधी घरींच करावी असा मंडळीचा विचार ठरला; परंतु सरकारची मंजूरी पाहिजे म्हणून ते कामठी मुक्कामीं साहेबाची भेट घेऊन समाधी करण्याची मंजुरी घेतली. मंजूरी मिळाल्यावर मोठ्या थाटानें स्नान वगैरे घातले स्नान झाल्यानंतर त्यांची पुजा करण्यांत आली. नित्य नियमाप्रमाणें भजनांच्या गजरांत ह्यांना समाधी दिली गेली.

विठोबा महाराजांची स्त्री हिनेंही आपला देह

मार्गशिर्ष वद्य ७ सन १३०७ या दिवशीं ठेवला आपण केव्हां मरणार हे तिला अगोदरच समजलें होतें. ह्मणून तिनें यादोरावबापू हे सेलु वोंराडास फिरावयास गेले असतां तेथून बोलावून आणिले. ते लवकरच धापेवाड्यास आले कृष्णाबाईनें मला जैमिनी अश्वमेधाची कथा ऐकण्याची इच्छा आहे असें सांगितलें, तेव्हां लक्ष्मणराव उपाध्यानीं पोथी वाचण्यास सुरुवात केली. पोथी अर्धी वाचून होत नाहीं तोंच बाईनीं देह विसर्जन केला.

---

# यादवराव बापू.

कोल्बाजीचे गादीवर हल्लीं यादवराव बापू आहेत. हे विठोबा महाराजाचे नातू होत. ह्यांच्या तीर्थरुपांचे नांव नामदेव व मातोश्रीचें नांव साकरूबाई विठोबा महाराज वैकुंठवासी झाल्यानंतर गादी बरेंच दिवस खालीं राहिली. विठोबाच्या मुलांपैकीं कोणी जिवंत नव्हते ह्मणून गादीचा स्वीकार करण्यास लोकांनीं यादवरावास प्रार्थना केली परंतु हे त्यास कबूल होईनात. आमचे येथें गादीवर बसण्याबद्दल साक्षात्कार होण्याची चाल आहे. तसा साक्षात्कार झाल्याशिवाय आह्मी गादीवर कधींही बसणार नाहीं. असें हे नेहमीं

ह्मणत. बरेंच दिवसपावेतों असा साक्षात्कार झाला नाहीं ह्मणून यादवरावनें गादीचा स्वीकारही केला नाहीं. परंतु इसवी सन १९०५ मध्यें एक चमत्कार झाला तो असाः—

मथुरावृंदावनाकडील नारायणबोवा नांवाचे एक साधू तीर्थयात्रा करीत करीत श्रीजगन्नाथास आले तेथें एकेदिवशीं रात्रीं जगन्नाथानें स्वप्न दिलें कीं ' तूं नागपूर प्रातांतील धापेवाडा ह्या नांवाच्या गांवीं जा. तेथें श्री कोलबाचा मठ आहे. त्यांच्या वाड्यांत जाऊन यादवरावास गादीवर बसावयास सांग व गादीवर बसून लोकांस उपदेशामृत पाजा असा यादवरावास उपदेश कर. ' हें स्वप्न पाहून नारायणबोवा दुसरे दिवशीं तेथून निघाले व शोध करतां करतां धापेवाड्यास येऊन पोंहचले.

नारायणबोवा अन्न खात नसते. हे फक्त दुधावरच रहात. कोलबाबोवाचे मठांत आल्यावर मामुली वहिवाटीप्रमाणें ह्यांना सीधा घेण्याची विनंती करण्यांत आली परंतु ह्यांनीं तो घेतला नाहीं. पुढें ह्याची प्रकृति फार बिघडली त्यामुळें लोकांच्या आग्रहावरून ह्यांनीं अन्न सेवन सुरू केलें. अस्तु नारयणबोवानें त्यांना झालेलें स्वप्न यादवरावास सांगितलें व गादीचा स्वीकार करण्यास विनंती केली. गांवांतील इतर लोक व यादवरावांची मातोश्री साकरूबाई ह्यांनींही यादवरावास ह्या विषयीं सांगितलें परंतु ते ह्मणाले आपल्या येथील पुर्वापार चालीप्रमाणें खुद्द धापेवाड्यास कांहीं चमत्कार

झाल्याशिवाय मी गादीचा स्वीकार करणार नाहीं. हें यादवरावाचें भाषण ऐकून नारायणबोवा पुन्हां आपली तीर्थयात्रा करावयास निघाले. पुढें सरासरी अडीच वर्षांनीं नारायणबोवा पुन्हां धापेवाड्यास आले व पूर्वीप्रमाणेंच गादीचा स्वीकार करण्यास यादवरावास विनवूं लागले. यादवरावानें आपला पूर्वीचाच आग्रह धरिला ह्मणून नारायणबोवा पुन्हां निघून गेले. पुढें आणखी दोन सव्वादोन वर्षांनीं नारायणबोवा धापेवाड्यास आले व पूर्वीप्रमाणेंच यादवरावास गादीचा स्वीकार करण्यास सांगितलें. परंतु यादवराव पुन्हां पूर्वीचाच आग्रह धरीत. ह्मणून नारायणबोवा ह्मणाले " आतां धापेवाड्यास चमत्कार होऊन जेव्हां तुह्मी गादीवर बसाल तेव्हांच मी येथून जाईन. " असें सांगून ते तेथेंच राहूं लागले.

कांहीं दिवसानीं नारायणबोवास व यादवरावाचे मातोश्रीस स्वप्न पडलें कीं " तुह्मी यादवरावास गादीवर बसवा. " दुसरे दिवशीं नारायणबोवानें आपलें स्वप्न यादवरावास सांगितलें व ह्मणाले कीं तुमच्या घरच्या मंडळीपैकीं कोणास तरी असेंच स्वप्न पडलें असावें ह्यांचे हें बोलणें होत आहे तोंच यादवरावाच्या मातोश्री आल्या व आपणास स्वप्न पडल्याचें सांगू लागल्या. परंतु यादवराव पुन्हां साशंक झाले. ते ह्मणाले चमत्कार होताना तिथीचा निश्चयही होत असतो मग आज फक्त स्वप्नच पडलें आहे. तिथी

वगैरे कांहींच कळविली नाहीं ह्मणून मी गादीचा स्वीकार करूं शकत नाहीं.

दुसरे दिवशीं रात्रीं नारायणबोवा ध्यानस्त असतां मार्गशीर्ष वद्य ७ किंवा १० ह्या दोन तिथीपैकीं एखाद्या तिथीस गादीवर बसवा असा साक्षात्कार झाला नारायणबोवानें हा चमत्कार दुसरे दिवशीं यादवरावास सांगितला. परंतु ह्या दोन तिथीपैकीं कोणती तिथी ठरवावी ह्याचा मोठा प्रश्न पडला. ह्मणून एका चिठ्ठीवर सप्तमी व एका चिठ्ठीवर दशमी असें दोन चिठ्ठ्यावर लिहून त्या कोलबाजींचे समाधीवर ठेवण्यांत आल्या. नारायणबोवानें सर्वांस भजन करण्यास सांगितलें. महाराजाचें उपाध्ये लक्ष्मणराव हे समाधीजवळ दोन्ही हात पसरून भजन करीत बसले होते. तेव्हां त्यांचे हातांत एक चिठ्ठी समाधीवरून गडबडून पडली. ती उघडून पहातांच त्यावर दशमी हीं अक्षरें लिहिलीं होती. मग सर्वानुमतें दशमीचाच निश्चय ठरला.

पुन्हां एक अडचण उद्भवली. अभिषेकास गंगेचें किंवा समुद्राचे पाणी पाहिजे. त्याशिवाय समारंभ व्हावयाचा नाहीं अशी ह्यांचे येथें वहिवाट होती. गंगा वगैरे आणावी तर दिवस फार थोडें राहिलें होते. म्हणून सर्वांस मोठी पंचाईत पडली. परंतु परमेश्वरानें ही अडचण दूर केलीच. नारायणबोवा ध्यानस्त असतां एके दिवशीं मध्यरात्रीं एकदम उठले

व चंद्रभागेंत स्नान करावयास गेले. स्नान करीत असतां चद्रभागेचें दक्षिण तीरावर ( मठाचे दक्षिणेस ) एक वडाचें झाड आहे त्या झाडाच्या मुळापासून एकदम पाण्याचा लोंढा चंद्रभागेंत आला. चंद्रभागेस एकदम पूर आल्यासारखें झालें. मोठा आवाज होऊं लागला. समुद्राप्रमाणें लाटा उसळूं लागल्या. नारायण-बोवा स्नान करीत होते त्या ठिकाणीं देखील एकदम पुष्कळसे पाणी झाले, म्हणून नारायणबोवा महाराजास व मठांतील इतर मंडळीस हा चमत्कार पहाण्यास मोठमोठ्यानें हांका मारूं लागले. परंतु कोणीच जागे झालें नाहीं व नारायणबोवाकडे आले नाहीं. म्हणून नारायणबोवानीं आपल्या जवळील भांडीं त्या नवीन पाण्यानें भरली व वाड्यांत जाऊन समाधी समोर ठेविली. भांडीं ठेवून बोवानीं वाड्यांतील सर्व मंडळीस जागे केले. सर्व मंडळी दिवे वगैरे घेऊन चंद्रभागेच्या कांठीं चमत्कार पहावयास आली. कडकडीत थंडीचे दिवस असतां नदीस एकदम पाणी कसे आले ह्याचे सर्वांस आश्चर्य वाटलें. वडाचे झाडाच्या मुळापासूनच पाणी जास्त होते. पलीकडे कांहीं नव्हतें. पाणी ओसरल्यावर पुराचीं सर्व चिन्हें प्रातःकाळीं लोकांस दिसलीं. नदीच्या काठानें केरकचरा व फेस लागलेला होता सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें, व ह्या दिवसापासून यादवरावास गादीवर बसविण्याची लोक मोठ्या उत्साहानें तयारी करू लागले. नारायणबोवानें

गुंडांत भरून ठेवलेलें पाणी समुद्राच्या पाण्याप्रमाणें खारें होतें. हें उत्सवाचें दिवशीं तीर्थाप्रमाणें सर्व लोकांस वाटण्यांत आले.

गादीवर बसविण्यास प्रातःकाळचे तीन घटकेचे मुहूर्त होते. लोक मोठ्या उत्साहानें काम करीत. या प्रसंगास सरासरी ३०—३२ हजार लोक बाहेरून आले होते. आठ दिवस अगोदर पासून लोक एक सारखे येत होते. चंद्रभागेचे वाळवंट लोकांनीं गच्च भरलेले दिसत होते. दुकानाची गर्दी इतकी झाली होती कीं वाळवंटात जागा न सांपडल्यामुळें कित्येक दुकानदारानीं नदीचे प्रवाहांत मोठमोठे उच तक्तपोस टाकून त्यावर आपली दुकानें मांडली होती. ह्या उत्सवास कित्येक भाविक गृहस्थानीं मदत केली. कोणी भाजी, कोणी धान्य, कोणी इतर जिन्नस ह्यांच्या गाड्या भरून पाठविल्या मोठ्या समारंभानें नेमलेल्या दिवशीं पुर्वीच ठरलेल्या सुमुहूर्तावर यादव-राव महाराजास गादीचा अभिषेक झाला. अभिषेकाचे वेळीं ब्राम्हणास द्यावयाकरितां एका भाविकानें एक कपिला गाय आणून दिली. उत्सव मोठ्या आनंदानें पार पडला. त्या दिवशीं अन्न खर्च किती झाला ह्याचा बरोबर अंदाज करतां येत नाहीं. गांवातील सर्व रस्त्यावर दिवसभर व रात्रौ बारा वाजत पावेतों दुतर्फा कोष्टी लोकांच्या पंक्ती बसत व उठत.

उत्सवाचे वेळीं कित्येक चमत्कार झाले त्यापैकीं

सर्व सांगत बसल्यास आमच्या ह्या चिमुकल्या पुस्तकांची कित्येक पृष्ठें लागतील. म्हणून त्यापैकीं एक दोनच आम्ही येथें देतों:–

(१) बारीक तांदळाचे पांच मोठमोठे गाडे भरून एका गृहस्थानें धापेवाड्यास उत्सवाकरितां पाठविलें. बोरगांवचे नाल्यापर्यंत तो गृहस्थ गाड्याबरोबर आला तेथें गाडीवाल्याचें भाडें चुकते करून ‘ तुम्ही गाड्या धापेवाड्यास कोलबाबोवाचे मठांत न्या. मी मागाहून येतो ’ असें सांगून तो तेथून निघाला. गाडीवाले पहातच होते. थोडे दूर गेला नाहीं तोंच तो गृहस्थ गुप्त झाला. गाडीवानास मोठे आश्चर्य वाटलें त्यांनीं हा कोणी साधु असावा असें समजून गाड्या धापेवाड्यास पोंहचत्या केल्या, व सर्व हकीकत निवेदन केली. ते तांदुळ यादवराव महाराजाचे येथें कोठींत ठेवण्यांत आले, एवढा अन्नखर्च झाला तरी तेथील तांदुळ संपले नाहींत.

(२) ऐन वेळेवर सर्पण संपलें. सर्पण संपले ह्मणून आचारी हांका मारूं लागले. धापेवाड्यांत व इतर आसपासच्या गांवांत शोध करण्याकरितां मनुष्य पाठविले परंतु सर्पण कोठेंच मिळेना. सर्वांना मोठी काळजी पडली परंतु इतक्यांत ९।६ गाडे सर्पण आणून गाडीवाल्यांनीं मठासमोर टाकून दिले. गाडे कोठून आणले व कोणी पाठविले असें जेव्हां लोकांनीं गाडेवाल्यास विचारलें तेव्हां ‘ एका बोवानें पाठविलें ”

एवढेंच फक्त त्यांनीं सांगितलें व तें निघून गेले.

असा मोठ्या आनंदानें उत्सव पार पडला. या समारंभात कित्येक रुपयाचे कापड इनाम देण्यांत आले. ब्राह्मणास दक्षणा देण्यांत आली. सर्व अतिथ अभ्यांगतांना तृप्त करण्यांत आले. सारांश कित्येक वृद्धलोक ह्मणतात कीं असा अपूर्व उत्सव धापेवाड्यास आजपावेतों कधींही झाला नव्हता.

• यादवराव महाराजांच्या मातोश्री साकरूबाई ह्या फार धर्मनिष्ट होत्या. ह्यांनीं कित्येक गोरगरीबांचीं लग्न मुंजी करून दिल्या. ह्या धर्मात्म्या स्त्रीनें आपला देह मार्गशीर्ष वद्य १२ सन १३१६ ह्या दिवशीं ठेविला. ह्या वेळींही पुष्कळ लोक आले होते. ह्या वेळेस एक चमत्कार झाला. ज्या गुंडांत बारा पायल्या तांदळाचा नेहमीं भात शिजवीत असत त्याच गुंडांत सात पायल्या तांदुळ मावेनात. मग सात पायल्याचाच भात करून खालीं ओतला तेव्हां त्याचा फार मोठा ढीग झाला व तो सर्व लोकांस पुरला.

कांहीं वर्षां मागें यादोरावबापु हे नागपुरास आलें व नागपूरांत बुधवारी पेठेंत कोलबाजी महाराजांचा मठ आहे त्याठिकाणीं येऊन राहिलें होते! तेथें ब्राह्मण भोजण, सत्पा वगैरे त्यामठांत झाला. व यादवराव महाराजांनीं त्यामठांत एक सभा भरविली त्यासभेस पांच हज्जारांचेवर लोक जमा झालें होतें. त्या सभेंत यादोरावांनीं मंडळीस असा उपदेश

केला कीं तुम्ही लोक दारू पिऊं नका कारण दारू पिणें हें अगदीं शास्त्राच्या विरूद्ध आहे, व त्यापासून शरीराची हानी होतें.

( २ ) व आपण मुलीचा पैसा लग्नाचे वेळेस घेतो तो घेऊं नये, कारण असें करणें शास्त्रांत पाप सांगितलें आहे व कोणतेही काम करूं नये, व आजपर्यंत जे साधू लोक झालें आहेत. तें परमेश्वर भक्तीनें, व परमेश्वरानें साधुसंताला पृथ्वीवर यासाठीं निर्माण केलें आहेत कीं साधुसंतानीं लोकांना इश भक्तीस लावावें यासर्वांनींच कृत्या पेक्षां जर तुह्मीं परमेश्वराचें नाम स्मरण करीत जाल तर त्यापासून तुह्मीं दिवसें दिवस वृद्धींगत व्हाल परमेश्वराची लिला अपरंपार आहे. याचें वर्णन करावे तितकें थोडेंच असा उपदेश करून सभा बरखास्त केली.

---

## निद्रा-स्वप्नदर्शन.

अनेक कारणानीं होणारी शरीराची झीज भरून काढण्यास अन्नसेवनाची जशी आवश्यकता आहे तशीच आवश्यकता झोंपेचीही आहे झोंप घेण्यास [illegible]त्र हाच समय योग्य आहे हें [illegible]सें उघड आहे, [illegible]तरी झोंप कितीकालपर्यंत घ्यावी हें निश्चित नाहीं रात्रीदिवस मिळून चोवीस तासांत अवघा सहाच तास निद्रा घेतली

तरीही कोणाकोणाची प्रकृती साफ राहूं शकते; पण कित्येक असे स्वप्पी असतात कीं, त्यास सात, आठ अथवा नऊ तास झोंप काढल्यावांचून बरें वाटत नाहीं!

निद्रा, आहार, व मैथुन हीं वाढविलीं तितकीं वाढतात आणि कमी करावीं तितकीं कमी होतात, असें म्हणतात तें खरें आहे. मोकळ्या हवेंत प्रत्यहीं व्यायाम करणें, पचन होईल इतकें व असेंच अन्न सेवन करणें, घोड्यावर स्वार होऊन किंवा होडींत बसून वाऱ्याकडे तोंड करून फेरफटका करणें, ह्यापासून निद्रा ( जरी नैसर्गिक व इच्छानधीन आहे तरी ) पुष्कळ वृद्धिंगत होत असते. निद्रा वृद्धिंगत करण्याची जशीं हीं साधनें आहेत तशींच वाजवीपेक्षां फाजील अन्न भक्षण करणें, व पेय पिणें, अत्यंत श्रम करणें, व्यायामाचा अभाव, कोंदट किंवा अधिक उष्ण जागीं निजणें हीं निद्रा–नाशाचीं कारणें आहेत. ज्या जागीं निजावयाचें असेल तेथील उष्णतामान सुमारें साठ अंशा इतकें–जास्त गरमहि नव्हे व जास्त थंडहि नव्हे असें–असलें म्हणजे पांघरुणाची विशेष गरज न लागतां स्वस्थपणें झोंप येते.

दोन्हीं हात छातीशीं एकमेकांत अडकवून व मस्तक उशीवर नीट टेंकून डाव्या किंवा उजव्या कुशीवर सारखें पडून झोंपणें हें उत्तम निद्रासन होय. श्वासोश्वास नाकावाटे चालावा ह्मणून निजतवेळीं तोंड मिटून ध्यावें. निजतांना तोंड विसकटून टाकण्याची वाईट

नरत्र कोणाकोणास जडलेली असून तिच्या योगानें तीं मनुष्यें झोपेंत भेसूर व त्रास होईल असें घोरूं लागतात!

तोंडावरून पांघरुण घेऊन निजलें असतां मोठा अपाय होतो, कारण तसें केल्यानें झोंपलेल्या मनुष्यास अशुद्ध हवेंत श्वासोश्वास करावा लागतो. निजावयाचे बिछान्या भोंवती पडदे, मछरदाणी, भोंत, ( कापडी खोली ) अगदीं लगटून लावणें हेंही अशाच कारणास्तव अप्रशस्त आहे. डांस, चिलटें, मुरकुटें, ढेकूण, पिसा, इत्यादिकांचा उपद्रव असल्यास जाळीचे किंवा पातळ कापडाचे स्वच्छ पडदे वगैरे लावण्यास विशेष हरकत नाहीं; परंतु तसें नसून निजावयाचे जागेंतील हवा सुखावह असल्यास पडदे इत्यादि मुळींच लाऊं नयेत हें फार चांगलें. निजण्याचे खोलींत वारा चांगला मोकळा खेळत नसल्यास खोलीचें दार अर्धेमुर्धे उघडें टाकावें. दार किंवा खिडकी अजीबात उघडी टाकिली असतां अपायकारक असा वाऱ्याची झोंत आंत येण्याचा संभव असतो. अशा प्रकारचा सोसाट्या वारा निद्रेंत असतांना अंगास लागला असतां अंग बधीर होतें

दिवसभर अंगावर घालून वापरलेले कपडे रात्रीं काढून ठेऊन निजावें रात्रीं अंगांत घालण्याची व नेसण्याचीं प्रावणें निराळीं असावींत. दिवसा वापरावयाचीं चिरगुटें रात्रीं निजतेसमयीं धारण केलीं असतां, तीं जास्त मळकी होऊन नियमित मुदतीच्या आंत

फाटतात. रात्रीं अंगांत घातलेलें वस्त्र दिवसाहि अंगांत घालून फिरणें हें ओंगळवाणें आहे. हिंवाळ्या दिवसांत फलालिणी, धोबळी, किंवा निदान जाड देशी खादीची स्वच्छ बंडी, किंवा जाकिंन ( लांब्या बाह्यांची बंडी ) अंगांत घालावी. रात्रीं जो कपडा अंगांत घालावयाचा तो फार तंगहि असूं नये व फार पोकळहि असूं नये. उन्हाळ्या दिवसांत साधारणपणें पातळ अशा कापडाचें प्रावर्ण घालून निजावें. कित्येक बायका दिवसभर नेसलेलें लुगडें व चोळी हींच रात्रीहि अंगावर राहूं देऊन निजावयास जातात; पण हें आरोग्यशास्त्र व व्यवहारदृष्ट्या बरोबर नाहीं. निजतेसमयीं पुरुषाप्रमाणें त्यांनीं ही वस्त्रांतर करणें इष्ट आहे. स्त्री–पुरुष, उभयतांनी रात्रौ कांहीं तरी डोकीस घालून निजलें पाहिजे हें जरी सर्व संमत होण्यासारखें नाहीं, तरी प्रत्येकाची आवड, ऋतुमान, प्रकृति, व संवय ह्यास अनुसरून याप्रकर्णी ज्यानें त्यानें वर्तन ठेवावें. कित्येक लोकांस उभी टोपी, गळेबंद, फलालीनचा पट्टा किंवा पंचा डोईस गुंडाळून घेतल्याशिवाय झोंप लागत नसते. त्यांनीं ती आपली वहिवाट तशीच चालू राहूं द्यावी पण डोकीचें गुंडाळणें नेहमीं स्वच्छ ठेवण्याकडे अवश्य लक्ष पोंचवीत असावें. प्रातःकाळीं उठल्यावर बिछान्यातील धुवट व बिनधुवट अशीं सर्व पांघरुणें व अंगांत घातलेली बंडी इत्यादि थोडावेळ उन्हांत पसरून ठेवावीं. आणि मळकट व घाणेरडीं झालीं असल्यास धुण्याची व्यवस्था करावी.

बिछान्यांत देहविसर्जन करण्याची बहुतेक लहान मुलांस खोड असते, अशा मुलांच्या आईबापांनीं आपल्या घरांतील " मुतेरीं " प्रत्यहि साबण किंवा खारी माती लाऊन धुऊन टाकीत असलें पाहिजे. ह्यांच्या संबंधानें आणि विशेषतः पहिल्या प्रकारच्या वस्त्रासंबंधानें आमच्यापैकीं पुष्कळ लोक जितकी काळजी घ्यावयास पाहिजे तितकी घेत नाहींत ही फार लाजिरवाणी गोष्ट होय. बहुतेक बायका असलीं मुतेरीं नुसतीं उन्हांत सुकवून स्वस्थ ठेवतात, पण हें त्यांचें करणें अगदीं चुकीचें आहे. लहान मुलांच्या अंगांतील व बिछान्यांतील सर्व प्रावर्णें चांगलीं स्वच्छ राखिलीं असल्यास त्यापासून मुलांच्या व इतर मोठ्या माणसांचे प्रकृतीस सुख होतें. सारांश अंथरुणांतील वस्त्रें स्वच्छ ठेवणें ही गोष्ट झोंप चांगली लागण्यास साधनीभूत आहे. निजतेसमयीं खोलींचीं बंद केलेलीं द्वारें व खिडक्या सकाळीं खुल्या करून ठेवाव्या. खोलींतील मोरी खराट्यानें खसखसून घासून चांगली साफ करावी. तस्त, पिकदाणी वगैरे मुखरसधारक पात्रें, दररोज साफ करीत असावें. ह्या दोन्ही गोष्टीकडे पुष्कळ लोक लक्ष पोंचवीत नाहींत.

स्वप्न दर्शन हा एक अतिशय विलक्षण मानसिक चमत्कार असून त्याच्या उत्पत्तीचें वास्तविक कारण माहीत नसल्यानें प्राचीनकाळीं व हलीं देखील बरेच लोक तत्संबंधानें तर्कवितर्क करीत असतात. पॅट

होणाऱ्या गोष्टीचें स्वप्न हें दैवी दिग्दर्शन असावें असा पुष्कळांचा समज असतो. हा समज कितपत बरोबर आहे व मागें झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या गोष्टांशीं स्वप्नाचा वास्तविक कांहीं संबंध असतो किंवा नाहीं हा वादग्रस्त प्रश्न असून त्याचा यथायोग्य निर्णय करण्याचें काम मानसशास्त्रवेत्त्याचें आहे. मागें पुण्यांतील एका पत्रांत या संबंधानें बरीच चर्चा चाललेली होती; त्यावेळीं अनेक जणांनीं घडलेल्या किंवा घडणाऱ्या गोष्टीचा स्वप्नाशीं कित्येक प्रसंगी संबंध असल्याबद्दलचे स्वानुभव प्रसिद्ध केले होते. आह्मांस सदर्हू लोकांच्या अनुभवाविषयीं येथें चर्चा कर्तव्य नसून केवळ सामान्यदृष्ट्याच विचार करणें आहे.

चांगली गाढ झोंप लागली असतां स्वप्नें सहसा पडत नसतात, या वरून स्वप्न-दर्शन हें विकृत निद्रेचें लक्षण असतें हें उघड झालें. उताणें पडून निजणें, तंग बंडी किंवा कबजा घालून वर तोंड करून निजणें, यथेच्छ भोजन करून लागलींच झोंप घेणें, निजते वेळीं लघवी करण्याची हयगय करणें, कृमि विकार होणें, एखादी गोष्ट, देखावा, स्वरुप, चित्र किंवा विचार मनांत घोळत असतां झोंप येणें, हीं किंवा अशाच मासल्याचीं स्वप्न-दर्शनाचीं कारणें वैद्यशास्त्रांत आढळतात. सूक्ष्मपणें विचार करून पाहिलें असतां हें शेवटचें कारण बरेंच संयुक्तिक आहे असें दिसून येईल. कारण, इंद्रियें व बुद्धि हीं निद्रिस्त असतां,

स्मृति, भावना, किंवा दुसरे मानसिक विकार बंद पड-तातच असा नियम नसल्यामुळें व विचारशक्ति सारखें नियमन करणारें मूलतत्वहि स्वस्थानीं नसल्याकारणानें, तऱ्हेतऱ्हेच्या विचारलहरी बिनधोकपणें मनांत उद्भूत होत असतात !

झोंपं लागण्यापूर्वीं जशी स्थिती असेल त्याप्रमाणें स्वप्नाचें विचित्र स्वरूप कमी अधिक होत असतें. अंगांतील उष्णतेनें किंवा अजीर्ण विकारानें पडणाऱ्या स्वप्नाचें बहुतकरून सादृश्य असतें. जडान्न खाल्ल्यानें उत्पन्न झालेल्या अजीर्णापासून पडणारीं स्वप्नें भयंकर असतात. अशा स्वप्नाचें स्वरूप भयप्रद असल्यानें निद्रिस्त माणसास आपल्या उरावर भूत, पिशाच्च, राक्षस, वगैरे बसलें असून तो आपणास वांकुल्या दाखवीत आहे असा भास होतो; किंवा खवळलेल्या समुद्रांत अगर प्रचंड पूर आलेल्या नदींत आपण गटांगळ्या खात आहोंत असा त्यास भास होतो ! एकंदरींत स्वप्नानें उत्पन्न होणाऱ्या विपत्तींस कांहीं मर्यादा नसते !

कोलबाजीबुवाचें चरित्र भाग दुसरा थोडक्याच दिवसांत तयार होईल.

# समाप्त.